# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ४ था ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १७ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## मनू भाकर अन् डी गुकेशसह ४ 'अनमोल रत्नां'चा राष्ट्रपतींकडून मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ नवी दिल्ली**

भारताची नेमबाज अन् ऑलिम्पियन क्वीन मनू भाकरसह बुद्धिबळाच्या पटलावरील नवा राजा डी. गुकेश, हॉकीपटू हरमनप्रीत सिंग आणि पॅरा प्रवीण कुमार यांना क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च मेजर ध्यान्यचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आपापल्या क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च कामगिरीसाठी या चौघांना क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार जाहीर झाला होता. शुक्रवारी देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या खेळाडूंना पुरस्कार प्रदान करण्यात आला.



मनू भाकर ही देशातील सर्वोत्तम नेमबाजपटू आहे. २०२४ च्या ऑलिम्पिक स्पर्धेत मनू भाकरनं वैयक्तिक आणि मिश्र इवेंटमध्ये कांस्य पदकाची कमाई केली होती. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके जिंकणारी ती पहिली भारतीय महिला खेळाडू आहे. तिच्या या सर्वोत्तम कामगिरीबद्दल तिला देशातील सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डी गुकेश हा सर्वोत्तम बुद्धिबळपटू पैकी एक आहे. २०२४ मध्ये जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत बाजी मारत तो सर्वात युवा जगजेत्ता ठरला होता. बुद्धिबळाच्या खेळात छाप सोडून क्रीडा जगतात डंका वाजवणाऱ्या या युवा खेळाडूला राष्ट्रपतींकडून मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सर्वोत्तम हॉकीपटू हरमनप्रीत सिंग याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने ऑलिम्पिक स्पर्धेत कमाल करून दाखवली. त्याच्या नेतृत्वाखालीच भारतीय संघानं २०२४ च्या ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्य पदकाची कमाई केली होती. याआधीच्या ऑलिम्पिक स्पर्धेतील भारतीय हॉकी संघाने कांस्य पदकाची कमाई केली होती. याशिवाय २०२३ मध्ये आशिया क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदकाचा पराक्रमही या खेळाडूने करून दाखवला आहे. या उल्लेखनिय कामगिरीबद्दल हरनप्रीत सिंगला खेलरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रवीण कुमार याने पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ स्पर्धेत पुरुष गटातील उंच उडी टी-६४ क्रीडा प्रकारात सुवर्ण पदकाची कमाई केली होती. २०२० मध्ये टोकियोत पार पडलेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत या पठ्ठ्यानं रौप्य पदक जिंकले होते. २०२२ मध्ये आशियाई पॅरा गेम्समध्ये त्याने सुवर्ण पदकाला गवसणी घातली होती. या लक्षवेधी कामगिरीसह त्यो पॅरा ॲथलेटिक्समध्ये आपली छाप सोडली. प्रवीण कुमार याला क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च अशा खेलरत्न पुस्काराने सन्मानित करण्यात आले.

## बीड जिल्हा पुन्हा हादरला; जमावाच्या हल्ल्यात दोन सख्ख्या भावांचा मृत्यू, तिसरा गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७बीड**

बीड जिल्ह्यात मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर कायदा व सुव्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. राज्यभराचे लक्ष बीड जिल्ह्याकडे लागले. या प्रकरणातील आरोपींना कडक शिक्षा व्हावी, यासाठी सर्वच क्षेत्रातून दबाव वाढला. मात्र तरीही बीडमधील गुन्हे थांबण्याचे चित्र दिसत नाही. गुरुवारी रात्री आष्टी तालुक्यातील वाहिरा नावाच्या गावात दोन सख्या भावांची जमावाने हत्या केली. या घटनेनंतर बीड जिल्हा पुन्हा एकदा हादरला आहे. पोलिसांनी काही जणांना ताब्यात घेऊन चौकशी सुरु केल्याची माहिती मिळत आहे.

अजय भोसले आणि भरत भोसले असे मृत भावांचे नाव असून कृष्णा भोसले हा गंभीर जखमी आहे. हे तिघेही त्यांच्या गावात उभे असताना गावातील आणि बाहेरील काही लोक जमा झाले. यातील काही लोकांनी या तीनही भावांवर शस्त्राने हल्ला चढवला. मारहाण आणि खून नेमका कोणत्या कारणाने



झाला? हे मात्र अद्याप समजले नसून आष्टी ग्रामीण रुग्णालयात मृतदेहाचे शवविच्छेदन सुरू आहे.

अंभोरा पोलीस ठाण्याचे अधिकारी, स्थानिक प्रशासन आणि गुन्हे अन्वेषण विभागाचे अधिकारी या प्रकरणाचा तपशीलवार तपास करत आहेत. दरम्यान जिल्ह्यांत वारंवार घडणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

## पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना १४ वर्षांचा तुरूंगवास



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ इस्लामाबाद**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना अल-कादिर ट्रस्टच्या जमीन भ्रष्टाचार प्रकरणात १४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. इम्रान खान यांच्यासह त्यांच्या पत्नी बुशरा बीबी यांनाही दोषी ठरवण्यात आलेस असून, त्यांना सात वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे, असे वृत्त पाकिस्तानच्या डॉन न्यूजने दिले आहे. यासोबतच न्यायालयाने इम्नान यांना १० लाख तर, त्यांची बुशरा खान यांना ५ लाख रुपयांचा दंडही ठोठावला आहे.

पाकिस्तानच्या नॅशनल अकाउंटेबिलिटी ब्युरोने (एनएबी) डिसेंबर २०२३ मध्ये इम्रान खान, बुशरा बीबी आणि इतर सहा जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला होता. यामध्ये त्यांच्यावर देशाच्या तिजोरीचे १९० दशलक्ष पौंड (५० अब्ज पाकिस्तानी रुपये) नुकसान केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. त्यानंतर याच प्रकरणात न्यायलयाने इम्रान खान यांना १४ वर्षांची तर, त्यांची पत्नी बुशरा बीबी यांना सात वर्षांच्या तुरूंगवासाची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाच्या निकालानंतर लगेचच बुशरा बीबी यांना अटक करण्यात आली असून, इम्रान खान आधीपासूनच तुरूंगात आहेत.याआधी इस्लामाबादच्या भ्रष्टाचारविरोधी न्यायालयाने निकाल देण्यासाठी १७ जानेवारी ही तारीख निश्चित केली होती. स्थानिक मीडियाच्या बातम्यांनुसार, न्यायमूर्ती नासिर जावेद राणा यांनी गेल्या वर्षी १८ डिसेंबर रोजी या खटल्याची सुनावणी पूर्ण केली होती, तर त्यांनी निकाल देण्यासाठी २३ डिसेंबरची तारीख राखून ठेवली होती. नंतर त्यांनी निकाल जाहीर करण्यासाठी ६ जानेवारी ही तारीख निश्चित केली होती. मात्र, न्यायमूर्ती राणा ६ जानेवारी रोजी रजेवर होते, त्यामुळे निर्णय १३ जानेवारीपर्यंत पुढे ढकलण्यात आला होता. त्यानंतर आज अखेर यावर निकाल देण्यात आला आहे.

## प्रजासत्ताकदिनी सर्व जिल्ह्याचे पालकमंत्री झेंडा फडकावतील; बावनकुळे यांचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नागपूर**

पालकमंत्र्यांच्या नियुक्त्यांबाबात महायुती सरकारमध्ये कुठलच पेच नाही. युती असल्याने सर्वांच्या मतांचा विचार करावा लागतो. मात्र ही अडचणसुद्धा आता राहिली नाही. २६ जानेवारीपूर्वी प्रत्येक जिल्ह्याचा पालकमंत्री जाहीर झाल्याचे तुम्हाला दिसेल असा दावा भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीच्या कार्यकाळात पालकमंत्री कोण होते हे कोणालाही ठावूक नव्हते असे सांगून त्यांनी तत्कालीन पालकमंत्री नितीन राऊत यांना टोला गलावला.

विशेष म्हणजे बावनकुळे यांनी १७ किंवा १८ जानेवारीला पालकमंत्र्यांच्या नावाची घोषणा केली जाणार असल्याचे यापूर्वी सांगितले. आता त्यांनी २६ जानेवारीपूर्वी असे सांगितल्याने अद्यापही पालकमंत्र्यांच्या नियुक्त्यांबाबत महायुतीत एकमत होत नसल्याची चर्चा आहे. असे असले तरी पालकमंत्र्यांबाबत फार जास्त वाट पहायची गरज नाही, मुख्यमंत्र्यांचा तो अधिकार आहे ते लवकरच निर्णय घेतील असेही त्यांनी स्पष्ट केले.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपूर जिल्हा परिषदेचा



आढावा घेतला. नागपूर जिल्हा परिषदेचा कार्यकाळ संपायला अवघा एक दिवस शिल्लक राहिला आहे. उद्यापासून नागपूर जिल्हा परिषदे प्रशासकाच्या हाती जाणार आहे. नागपूर जिल्हा परिषदेची निवडणूक केव्हा होईल यावरही बावनकुळे यांनी आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले, याचे सर्व अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे आहे. त्यांना आम्ही जी काही मदत लागले ती सरकार म्हणून करणार आहोत.ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. जानेवारी महिन्याच्या अखेरीस सर्वोच्च न्यायालयाच्या निकाल येणे अपेक्षित आहे. त्यानंतर महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिकांचा निवडणुकीचा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने जाहीर होईल. दाहावी व बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक बघून आम्ही राज्य निवडणूक आयोगाला निवडणुकांच्या तारखा जाहीर करण्याची विनंती करणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

## धनंजय मुंडेंच्या कार्यकाळात धोरण कशासाठी बदलले? हायकोर्टाने राज्य सरकारला मागितले स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नागपूर**

२०२३ मध्ये राज्य सरकारला कृषी साहित्य खरेदीच्या धोरणात बदल करण्याची गरज का पडली, अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने केली आहे. यासंदर्भात राजेंद्र मात्रे यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेतील आरोपात तथ्य असल्याचे निरीक्षण नोंदवीत न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठाने सरकारला दोन



आठवड्यांत स्पष्टीकरण मागितले आहे.

कृषी विभागाने ५ डिसेंबर २०१६ रोजी कृषी साहित्य खरेदीसाठी डीबीटी योजना सुरू केली होती. २०२३ मध्ये मुंडे हे कृषीमंत्री असताना यात बदल झाला.

**याचिकेत कोणते आरोप?**

२३ ऑक्टोबर २०२३ रोजी तत्कालीन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी डीबीटी योजना बंद केली आणि स्वत: कृषी साहित्य खरेदी करण्याचा निर्णय घेतला. यासाठी राज्य शासनाने १०३.९५ कोटी रुपयांचा निधी देखील मंजूर केला होता.

१२ मार्च २०२४ च्या परिपत्रकानुसार शासनाकडून बॅटरीवर चालणारा स्प्रे पंप खरेदीसाठी दीड हजार रुपये प्रतिपंप या हिशोबाने ८०.९९ कोटी रुपयांचा निधी दिला जाणार होता. मात्र, शासनाने तीन लाख तीन हजार ५०७ पंप सुमारे १०४ कोटी रुपयांमध्ये विकत घेतले.

याचिकाकर्त्यानुसार, शासनाला एक पंप ३,४२५ रुपयांत मिळाला. यवतमाळच्या एका दुकानात याच पंपाची किंमत २,६५० रुपये होती.

मोठ्या संख्येत पंपाची खरेदी होत असल्याने शासनाकडे बाजारमूल्यापेक्षा कमी किमतीत पंप विकत घेण्याची संधी होती, मात्र शासनाने जास्तीची किंमत मोजत पंप खरेदी केले.

## दिंडोरीच्या आश्रमात वाल्मिकचा मुक्काम, सीआयडी पण तिथं गेली होती : तृप्ती देसाईंचा नवा बॉम्ब

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७पुणे**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे हे १५ आणि १६ डिसेंबर रोजी नाशिक जिल्ह्यातील दिंडोरीमधील आश्रमात मुक्कामाला होते. १७ तारखेला ते तिथून निघाले. बीड आणि अहिल्यानगरपासून नाशिक जिल्हा जवळ आहे. महाराष्ट्रात या प्रकरणावरुन एवढा गोंधळ सुरू असताना पोलीसांना हे आरोपी कसे सापडले नाहीत? सोबतच त्यांना जर इथल्या आश्रम प्रमुखांनी आश्रय दिला असेल तर सीआयडी आणि एसआयटी अधिकाऱ्यांनी याची चौकशी करायला हवी, अशी मागणी करत भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी ही संतोष देशमुख हत्या प्रकरणात एन्ट्री घेतली आहे. त्या पुण्यात माध्यमांशी बोलत होत्या.

यावेळी देसाई यांनी वाल्मिक कराड मुक्कामी असलेल्या ठिकाणी सीआयडीचे पथकही गेले होते, असा बॉम्ब फोडला. जेव्हा वाल्मिक कराड



पुण्यात सरेंडर करणार होता. त्याच्या दोन ते तीन दिवस आधी सीआयडीचे पथक त्या आश्रमात गेले होते. तिथे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात वाल्मिक कराड दिसून आला होता. पण हे सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी सीसीटीव्हीची माहिती का दिली नाही? असा सवाल करत हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला गेला का, याचा तपास गृहमंत्र्यांनी केला पाहिजे अशी मागणीही त्यांनी केली.

## अजितदादांच शिर्डीत नवसंकल्प शिबिर

### राज्यातील राजकीय निश्चितीसाठी कोणती गुलाबी घोषणा करतात, याकडे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७शिर्डी**

अजित पवार यांनी शरद पवार यांची साथ सोडल्यानंतर राजकारणात महायुतीच्या मदतीने वाटचाल सुरू केली. लोकसभा निवडणुकीत महायुतीला फटका बसल्यानंतर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचं काय होणार, असा प्रश्न होता.

परंतु विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांनी



'गुलाबी' रंगाचे जॅकेट अंगावर चढवलं अन् महाराष्ट्र पिंजून काढला. विधानसभेच्या निवडणुकीत तब्बल ४१ आमदार निवडून आणले. या यशामागे अजित पवार यांनी विधानसभेला निवडलेला 'गुलाबी' रंग असल्याचे बोलले जाते. आता विधानसभेतील यशानंतर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे शिर्डीत नवसंकल्प शिबिर होत आहे. या शिबिरात देखील 'गुलाबी' रंगाची छटा उमटणार, अशी वातावरण निर्मिती करण्यात आली आहे.

आता विधानसभा निवडणुकीनंतर शिर्डीत अजित पवार यांच्या उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राज्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे नवसंकल्प शिबिर होत आहे. या शिबिराची तयारी जोरात सुरू आहे. शिबिरासाठी उभारण्यात आलेल्या मंडपात गुलाबी रंगाला प्राधान्य देण्यात आलं आहे. त्यामुळे या नवसंकल्प शिबिरात अजित पवार पक्षाच्या राज्यातील, देशातील वाटचालीसाठी आणि आगामी काळात राज्यातील राजकीय निश्चितीसाठी कोणती गुलाबी घोषणा करतात, याकडे लक्ष लागलं आहे.

## सैफ अली खानच्या मणक्यातून काढलेल्या चाकूचा फोटो आला समोर; हल्ल्यात थोडक्यात बचावला अभिनेता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

सैफ अली खानच्या वांद्रे (पश्चिम) येथील घरात गुरुवारी (१६ जानेवारी) मध्यरात्री दरोडेखोर शिरला होता. त्याच्याबरोबर झालेल्या झटापटीत सैफ अली खान जखमी झाला. मुलांना वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या सैफवर दरोडेखोराने धारदार चाकूने वार केले, ज्यामुळे सैफला गंभीर दुखापत झाली. त्याला जखमी अवस्थेत लिलावती रुग्णालयात दाखल



करण्यात आलं आणि डॉक्टरांनी त्याच्यावर शस्त्रक्रिया केली. आता त्याच्या प्रकृतीबद्दल डॉक्टरांनी अपडेट दिली आहे.

सैफ अली खानवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी आज (शुक्रवारी) दिलेल्या माहितीनुसार, तो हल्ल्यात थोडक्यात बचावला. चाकू त्याच्या मणक्यापासून फक्त दोन मिलीमीटर दूर होता. सैफ आता बरा असून काळजी करण्याचे कारण नाही, असं डॉक्टरांनी नमूद केलं. तसेच सैफवर शस्त्रक्रिया करणारे न्यूरो सर्जन डॉ. नितीन डांगे यांनी तो खूप भाग्यवान असल्याने वेळीच रुग्णालयात पोहोचला, असं म्हटलं आहे.त्याची प्रकृती ठीक आहे

## संपादकीय ......

# पुरोगामी पवार संघाच्या प्रेमात!

काही वर्षांपूर्वी निवडणुकीच्या एका प्रचारसभेत, तुम्ही हाफ चड्डीवाल्यांना मत देणार का, अशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आणि भाजपची खिल्ली राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी उडवली होती. तेच पवार आता त्याच हाफ चड्डीवाल्या स्वयंसेवकांच्या प्रेमात पडले आहेत. संघाची कार्यपद्धती त्यांना खूप आवडली आहे. एकेकाळी उद्धव ठाकरे हेसुद्धा संघाची कार्यपद्धती आणि शिस्त यांच्या प्रेमात पडले होते.

त्यांनी म्हणे शिवसेनेला संघासारखे शिस्तबद्ध वळण देण्यासाठी आराखडा बनवला होता. त्यानुसार पुढची वाटचाल करायचे ठरवले होते. शरद पवार यांच्या पक्षाची रविवारी मुंबईत बैठक झाली. त्यावेळी त्यांनी आपले विचार मांडले. लोकसभेत शरद पवार यांच्या पक्षाचा समावेश असलेल्या महाविकास आघाडीला भरघोस यश मिळाले. लोकसभेत राज्यातील ४८ पैकी ४५ जागा मिळवू, असे छातीठोकपणे सांगणार्या महायुतीची दाणादाण उडाली.

त्यामुळे त्यांच्या नेत्यांच्या पोटात भीतीचा गोळा तर महाविकास आघाडीच्या गोटात आनंदाचे उधाण आले, पण जेव्हा राज्यात विधानसभेची निवडणूक झाली तेव्हा महाविकास आघाडीला अपयशाचा प्रचंड धक्का बसला. सुरुवातीला महाविकास आघाडीतील नेत्यांनी मतदान यंत्रावर खापर फोडून राज्यभर आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला, पण त्याचा काही उपयोग होणार नाही असे कळल्यावर ते सोडून दिले. कारण निवडणूक आयोगासोबत सर्वोच्च न्यायालयानेही मतदान यंत्रावरून विरोधी पक्षांना झापले. कारण विजय होतो तेव्हा तुमची तक्रार नसते, पण पराजय झाला की तुम्हाला मतदान यंत्रात दोष दिसतो, असे सुनावले.महाविकास आघाडीचे शिल्पकारच शरद पवार आहेत, पण पुढे त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटला आणि त्याची मालकी आणि चिन्ह अजित पवार यांच्याकडे गेले. त्यांचा पक्ष विस्कळीत झाला. शरद पवार यांच्यासोबत अनेक वर्षे राहिलेले आणि त्यांचे निष्ठावंत म्हणून ओळखले जाणारे दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ यांच्यासारखे नेते त्यांना सोडून गेले. याची खंत शरद पवार यांना नक्कीच वाटत असेल. कारण पक्षाला निष्ठावंत नेते आणि कार्यकर्ते मिळाले नाही तर पक्षाची अवस्था काय होऊ शकते याचा प्रत्यक्ष अनुभव पवार सध्या घेत आहेत.विधानसभा निवडणुकीतही आपल्याला लोकसभा निवडणुकीप्रमाणे यश मिळेल असे वाटत असताना भलतेच घडले. महाविकास आघाडीची इतकी दाणादाण उडाली की विधानसभेत विरोधी पक्षनेत्याचे स्थान असू द्या, अशी विरोधकांकडून सत्ताधार्यांना विनंती करावी लागली. इतकी दयनीय अवस्था का झाली, याचा विचार शरद पवार यांनी नक्कीच केला असेल. विधानसभा निवडणुकीत भाजपला जे भरघोस यश मिळाले त्यामागे काय कारण आहे, ते त्यांना सापडले. तेच त्यांनी पक्षाच्या बैठकीत मांडले.

भाजपची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी भाजपसाठी केलेले नि:स्वार्थ कार्य म्हणजे घरोघरी जाऊन केलेला प्रचार भाजपच्या विजयाला कारणीभूत ठरला. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारखी निष्ठावान कार्यकर्त्यांची फळी निर्माण व्हायला हवी. संघाच्या कार्यकर्त्यांची त्यांच्या विचारधारेशी असलेली निष्ठा आणि वचनबद्धता विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून दिसून आली. आपणही छत्रपती शाहू महाराज, जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेशी एकनिष्ठ असणार्या कार्यकर्त्यांचे एक मजबूत जाळे उभारण्याकडे लक्ष दिले पाहिजे, असे आवाहन पवारांनी केले.संघासोबत राष्ट्रसेवा दल आणि इतर काही संघटनांची स्थापना झाली होती, पण त्यांचा प्रभाव ओसरला. भाजपसारखी अन्य कुठल्या पक्षाला समांतर संघटना निर्माण करता आली नाही, अशी खंत पवार यांनी व्यक्त केली. मुद्दा असा आहे की पवार जेव्हा विचारधारेशी निष्ठा आणि वचनबद्धता यांचा उल्लेख करतात तेव्हा पवार यांचा आजवरचा राजकीय प्रवास पाहिला तर वरील दोन शब्दांशी त्यांनी किती वेळा फारकत घेतली ते दिसून येईल. पवारांना निष्ठा आणि वचनबद्धता पाळणारे कार्यकर्ते हवे आहेत, पण त्यांनी त्याचे किती पालन केले, असा प्रश्न उपस्थित होतो.

शाहू, फुले आणि आंबेडकर यांच्या नावाचा जयघोष करीत शरद पवारांनी आपली राजकीय कारकीर्द उभी केली. त्याचवेळी त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला संकुचित, जातीयवादी, धर्मवादी म्हणून कायम हिणवले, पण त्याच पवारांना आज संघाचे कार्यकर्ते आणि त्यांच्या कार्यपद्धतीचे अनुकरण करावे असे वाटत आहे. खरंतर सहकार क्षेत्रात पवारांचे मोठे नाव आहे. त्यांनी अनेक सहकारी संस्था उभ्या केल्या आहेत. त्या माध्यमातून त्यांनी अनेकांना श्रीमंत बनवले आहे.बारामतीला त्यांनी समृद्ध बनवले आहे, पण आर्थिक समृद्धीतून निष्ठावान लोक घडतीलच असे नाही. उलट यातून बरेचदा नफ्यातोट्याचाच अधिक विचार करणारे तयार होतात. इथेच संघाचे स्वयंसेवक वेगळे ठरतात. ते आर्थिक नफ्यातोट्याचा विचार करीत नाहीत. त्यांना जे नेमून दिलेले काम असते ते निमूटपणे करतात. ते कुठलाही गाजावाजा करीत नाहीत. निष्ठा कितीही पैसे मोजले तरी बाजारात विकत मिळत नाही हे पुरोगामी पवारांना माहीत नाही का?

# SIP चे असतात ६ प्रकार! बहुतेक गुंतवणूकदारांना फक्त एकच माहिती

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक –** शेअर मार्केटमधील जोखीम कमी करुन नफा मिळवण्याचा मार्ग म्हणजे एसआयपीद्वारे म्युच्युअल फंडात गुंतवणूक. SIPद्वारे म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणारे लोक गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढले आहेत. असे असूनही, बहुतेक गुंतवणूकदारांना फक्त १ प्रकारची एसआयपी माहित आहे. म्हणजे मासिक SIP. पण तुम्हाला माहिती आहे का की डखझ चे ६ प्रकार आहेत? यातील कोणती पद्धत तुमच्यासाठी फायदेशीर आहे?

**नियमित एसआयपी**– बहुतेक गुंतवणूकदार नियमित एसआयपीद्वारे गुंतवणूक करतात. यामध्ये गुंतवणूकदार दर महिन्याला ठराविक रक्कम गुंतवतात. तुम्ही मासिक, द्वैमासिक, तिमाही किंवा सहामाही आधारावर गुंतवणूक करणे निवडू शकता. यामध्ये ठराविक तारखेला खात्यातून रक्कम कापली जाते.

शेअर मार्केटमधील जोखीम कमी करुन नफा मिळवण्याचा मार्ग म्हणजे एसआयपीद्वारे म्युच्युअल फंडात गुंतवणूक. डखझ (सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) द्वारे म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणारे लोक गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढले आहेत. असे असूनही, बहुतेक गुंतवणूकदारांना फक्त १ प्रकारची एसआयपी माहित आहे. म्हणजे मासिक SIP. पण तुम्हाला माहिती आहे का की SIP




चे ६ प्रकार आहेत?

बहुतेक गुंतवणूकदार नियमित एसआयपीद्वारे गुंतवणूक करतात. यामध्ये गुंतवणूकदार दर महिन्याला ठराविक रक्कम गुंतवतात. तुम्ही मासिक, द्वैमासिक, तिमाही किंवा सहामाही आधारावर गुंतवणूक करणे निवडू शकता. यामध्ये ठराविक तारखेला खात्यातून रक्कम कापली जाते.

**शाश्वत एसआयपी**– नावाप्रमाणेच, शाश्वत एसआयपी मध्ये कोणताही कार्यकाळ नाही. याचा अर्थ गुंतवणूकदार त्यांना पाहिजे तोपर्यंत ही SIP सुरू ठेवू शकतात. व्यावहारिकदृष्ट्या गुंतवणूक दार त्यांच्या एसआयपी सुरू करताना खूप दीर्घ मुदतीसाठी जातात. तुम्हाला पाहिजे तेव्हा तुम्ही SIP थांबवू शकता. दीर्घकालीन चक्रवाढ शक्तीचा लाभ यात मिळतो. साधारणपणे, SIP चालू ठेवण्यासाठी सर्वात मोठा कालावधी ४० वर्षे आहे.

**फ्लेक्सिबल एसआयपी**– या एसआयपीचं वैशिष्ट्य म्हणजे गुंतवणूक रक्कम तुम्ही कधीही बदलू शकता. म्हणजे मासिक ५००० हजार गुंतवत असाल तर तुम्ही ती १० हजारही करू शकता. किंवा एखाद्या महिन्यात थांबवू शकता. जेव्हा बाजार उच्च असतो तेव्हा गुंतवणूकदार कमी रक्कम गुंतवू शकतो. याउलट बाजार कोसळल्या नंतर याचा फायदा उचलू शकतो.

**ट्रिगर एसआयपी**– ट्रिगर केलेल्या एसआयपी बाजाराच्या विशिष्ट हालचालींमुळे ट्रिगर होतात. उदाहरणार्थ, प्रत्येक वेळी शेअर बाजार एका दिवसात ५% घसरल्यावर तुम्ही SIP सेट करू शकता. अशा एसआयपी तुम्हाला बाजारातील ट्रेंडचा उत्तम फायदा घेण्यास मदत करतात. ट्रिगर केलेल्या SIP चा तुमच्या फायद्यासाठी वापर करण्यासाठी, तुम्हाला शेअर बाजाराची सखोल माहिती असणे आवश्यक आहे.

**टॉप-अप एसआयपी**– टॉप-अप एसआयपीमध्ये, तुम्ही तुमच्या SIP हप्त्याची रक्कम तुमच्या आर्थिक परिस्थितीनुसार ठराविक रकमेने वाढवू शकता. जेव्हाही तुमचे उत्पन्न वाढते किंवा तुम्हाला नोकरीत बढती किंवा पगारवाढ मिळते, तेव्हा तुम्ही तुमच्या परवडण्यावर अवलंबून अतिरिक्त SIP रकमेचा टॉप-अप करून तुमची रक्कम वाढवण्यासाठी या संधीचा वापर करू शकता.

**इन्शुरन्स एसआयपी** – या एसआयपीमध्ये गुंतवणूकदारांना गुंतवणुकीसोबत विमा संरक्षण देखील मिळते. म्हणजे गुंतवणूक दारांना मुदत विमा संरक्षण मिळते.

# ई-पीक पाहणी करायची राहून गेली काळजी करू नका; हा आहे अजून एक पर्याय


**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक** – राज्यात रब्बी हंगामातील शेतकऱ्यांच्या स्तरावरील पिकांची नोंदणी अर्थात ई-पीक पाहणीची मुदत बुधवारी संपली असून आतापर्यंत ३२ लाख २८ हजार हेक्टर क्षेत्रावरील पीक पाहणी पूर्ण झाली आहे.

आता सहायकांच्या स्तरावरील पाहणी गुरुवारपासून २८ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे. यंदा राज्य सरकारनेरब्बी हंगामातील शंभर टक्के लागवड क्षेत्राची पीक पाहणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.या पीक पाहणीत चुकलेल्या नोंदीची दुरुस्ती २८ फेब्रुवारीपर्यंत करता येणार आहे. रब्बी हंगामातील लागवड केलेल्या पिकांची नोंद करण्यासाठी राज्य सरकारने डिजिटल क्रॉप सर्व्हे हे ॲप उपलब्ध करून दिले आहे.ही पाहणी शेतकऱ्यांच्या स्तरावर १ डिसेंबरपासून बुधवारपर्यंत (दि. १५) करण्यात आली. राज्यात




त्यानुसार २ कोटी ९ लाख ४८ हजार ७३५ हेक्टर इतके क्षेत्र असून त्यापैकी ३० लाख ४३ हजार ३६६ हेक्टरवरील लागवड केलेल्या पिकांची नोंद करण्यात आली आहे.

तसेच कायम पड असलेले ८१ हजार ६३४ हेक्टर क्षेत्र तर चालू पड असलेले १ लाख ३ हजार ३१ हेक्टर क्षेत्रही यात नोंदविण्यात आले आहे. त्यानुसार एकूण ३२ लाख २८ हजार ३२ हेक्टर क्षेत्रावरील पीक पाहणी अर्थात नोंदणी पूर्ण झाली आहे.एकूण लागवड क्षेत्राच्या तुलनेत हे प्रमाण १५.४१ टक्के इतके आहे. शेतकऱ्यांच्या स्तरावरील पीक पाहणी संपल्यानंतर आता सहायक हे उरलेल्या क्षेत्राची पीक पाहणी करणार आहेत.पुढील ४५ दिवस ही नोंदणी होणार असून ज्या शेतकऱ्यांनी पिकांची नोंदणी केलेली






नाही, अशांनी ही नोंदणी सहायकांमार्फत करावी, असे आवाहन ई-पीक पाहणी प्रकल्पाच्या संचालक सरिता नरके यांनी केले आहे.

यंदा राज्यात असलेल्या सर्व १०० टक्के क्षेत्रावरील पिकांची नोंदणी करण्याचे निर्देश जमाबंदी आयुक्त डॉ. सुहास दिवसे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. आतापर्यंतच्या नोंदणीत ज्या शेतकऱ्यांची पीक पाहणी चुकली असेल, अशांनाही आता त्यात दुरुस्ती करण्याची संधी देण्यात आली आहे. यासाठी २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत असून अशा शेतकऱ्यांनी मंडळ अधिकाऱ्यांकडे अर्ज करावा. ही केलेली पीक पाहणी आता महाभूमी या संकेतस्थळावरील आपली चावडी या पोर्टलवरही उपलब्ध करून देण्यात आली आहे. झालेल्या नोंदणीची खात्री करण्यासाठी या पोर्टलचा वापर करावा.

– सरिता नरके, संचालक, ई-पीक पाहणी, भूमी अभिलेख

# रेल्वे मार्गाच्या कामकाजाने शेतातील पीक मातीमोल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७यवतमाळ –** रेल्वे मार्गाच्या कामकाजातून उडणारी धूळ थेट पिकांवर साचत आहे. यातूनच या मार्गावरील पिके मातीने माखली आहेत. परिणामी, शेतातील पिकांची वाढ खुंटली आहे. एकरी उत्पादनाला याचा मोठा फटका बसला आहे. कापूस, तूर या खरिपातील पिकांसह रब्बी हंगामातील गहू आणि हरभरा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी मदतीसाठी आता जिल्हा प्रशासनाकडे मागणी केली आहे.

वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे मार्गाचे कामकाज सुरू आहे. या रेल्वे मार्गावर असलेल्या तिवसा या गावाजवळील शेतशिवारातील शेतकऱ्यांना चालू असलेल्या माती कामाचा मोठा फटका बसला आहे. यामुळे शेतशिवारात काम करणेही



शेतकऱ्यांना अडचणीचे झाले आहे.

झालेले नुकसान महसूल अथवा रेल्वेने भरून द्यावे

शेतकऱ्यांच्या आर्थिक १ नुकसानीला महसूल आणि रेल्वे प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप शेतकरी करीत आहे. शेतकऱ्यांच्या शेतशिवारात झालेल्या नुकसानीची भरपाई रेल्वे प्रशासनाने अथवा महुल प्रशासनाने द्यावी, अशी विनंती राजेश राठोड, कैलास राठोड, अविनाश जाधव आदी शेतकऱ्यांनी केली आहे.

मागणीची पूर्तता व्हावी म्हणून यवतमाळ तालुक्यातील शेतकऱ्यांनी महसूल प्रशासनाकडे केली आहे. मात्र, अजूनपर्यंत या मागणीकडे शासकीय यंत्रणेकडून दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अजूनही मदत मिळाली नाही.

रेल्वे मार्गाच्या बाजूला अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेती आहे. त्यांचा संपूर्ण उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे. सतत उडणाऱ्या धुळीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे. आदा कुटुंब चालवायचे कसे? असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झाला आहे.




# वापरलेली चहापावडर फेकताय? त्याआधी हे वाचा

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक**

गरमागरम चहाने सकाळची सुरुवात केली जाते. चहा बनवून झाल्यानंतर उरलेली चहा पावडर कचऱ्यात फेकून दिली जाते. पण, तुम्हाला हे माहित आहे का? वापरलेली चहापावडर तुम्ही पुन्हा वापरू शकता. चहापावडरचा योग्य पद्धतीने वापर केल्यास किचनमधील



तुमची अनेक कामे सोपी होऊ शकतात. जसे की, स्वयंपाकघराची स्वच्छता, झाडांसाठी खत ते सौंदर्यवाढीसाठी सुद्धा चहा पावडर वापरता येते. जाणून घेऊयात, वापरलेली चहा पावडर साठवायची कशी आणि त्याचा वापर कसा करायचा,

वापरलेल्या चहा वापडरचा असा करावा वापर

चहा पावडरचा वापर खत म्हणूनही करता येईल. यामुळे खत विकत आणण्यासाठी अधिक पैसे खरेदी करावे लागणार नाही.

चॉपिंग बोर्डचा वास दूर करण्यासाठी वाळवलेल्या चहा पावडरचा वापर करावा.

प्लास्टिकचे डब्बे स्वच्छ करण्यासाठी तुम्ही वापरलेली चहा पावडर वापरू शकता. यासाठी उरलेली चहा पावडर स्क्रबरवर घेऊन त्याने डब्बे धुवून घ्यावेत.

वाळलेल्या चहा पावडरने तुम्ही लाकडी फर्निचर स्वच्छ करू शकता. यासाठी वाळवलेल्या चहापावडरमध्ये पाणी घालून कापडाने लाकडी फर्निचर पुसून घ्यावे. असे केल्याने फर्निचरला नव्यासारखी चमक येते.

चहा पावडरमध्ये ऍटी-ऑक्सिडंट असते. चहा पावडरचा वापर जखम झाल्यास किंवा खरचटल्यास करू शकता. यामुळे जखम भरण्यास मदत होते.

फ्रीजमधील दुर्गंधी दूर करण्यासाठी वापरलेल्या चहा पावडरचा वापर करता येईल. यासाठी तुम्हाला केवळ वाळवलेली चहा पावडर एका पिशवीत भरून फ्रीजच्या एका कोपऱ्यात ठेवायची आहे. या टिप्समुळे फ्रीजमधील दुर्गंधी दूर होण्यास मदत होते.

पायपुसणी प्रत्येकाच्या घरात असते. पायपुसणीचा सतत वापर होत असल्याने कालांतराने पायपुसणीला एक प्रकारचा दुर्गंध येऊ लागतो. अशावेळी पायपुसणी धुताना साबणासोबत चहा पावडरचा वापर करावा.

चहा पावडरने तुम्ही खिडक्यांच्या काचा किंवा काचेची भांडी स्वच्छ करू शकता.

उरलेली चहा पावडर तुम्ही केसांवरही लावू शकता. यामुळे केस चमकदार आणि मजबूत होतात. यासाठी जेव्हा मेहंदी केसांना लावाल तेव्हा त्यात वाळवलेली चहा पावडर टाकावी.

**अशी साठवा चहा पावडर**

सर्वात आधी चहापावडर पूर्णपणे सुकवून घ्यावी.

योग्य पद्धतीने चहा पावडर सुकवल्यानंतर ती स्टोअर करणे गरजेचे असते.

स्टोअर करण्यासाठी चहा पावडर एअर पॅक डब्यात ठेवावी आणि गरजेप्रमाणे वापरावी.

# मागेल त्याला तत्काळ वीज जोडणी देण्यावर महावितरणचा भर

## परिमंडळात साडे नऊ महिन्यात देण्यात आली ३३ हजार ग्राहकांना नविन वीज जोडणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती** –‘इझ ऑफ लिव्हिंग’ नुसार वीज ग्राहकांना उत्तम सेवा देण्याबरोबरच नविन ग्राहकांना तत्काळ वीज जोडणी देण्यासाठी महावितरणची यंत्रणा प्रयत्नशील आहे. त्या अनुषंगाने चालू आर्थीक वर्षात म्हणजेच एप्रिल ते १५ जानेवारी या साडे नऊ महिन्यात परिमंडलात घरगुती,वाणिज्यिक,औद्योगिक,कृषी अशा विविध वर्गवारीतील ३३ हजार २७१ ग्राहकांना नविन वीज जोडणी देण्यात आली आहे.

नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकारने ‘इझ ऑफ लिव्हिंग’ संकल्पना आणली आहे. वीज ही आज मुलभूत गरज बनलेली असल्याने अखंडित आणि दर्जेदार वीज पुरवठा याचा समावेश या संकल्पनेत करण्यात आलेला आहे.

त्यानुसार अमरावती परिमंडलात महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिलेले निर्देश आणि वीज नियामक आयोगाने निर्धारीत केलेल्या कृती मानकांनूसार विहित कालावधीत नविन वीज जोडणी देणे,अखंडित व दर्जेदार वीजपुरवठ्यासह ग्राहकांच्या तक्रारी प्राधान्याने सोडविण्यावर भर देण्यात आला आहे. अमरावती परिमंडलात एप्रिल २०२४ ते १५ जानेवारी २०२५ या साडे नऊ महिन्याच्या कालावधीत विविध वर्गवारीतील एकुण ३३ हजार २७१ नविन ग्राहकांना वीज जोडणी देण्यात आलेली आहे.यामध्ये सर्वात जास्त संख्या ही घरगुती ग्राहकाची असुन ती २५ हजार ४९५ इतकी आहे.

या कालावधीत वाणिज्यिक वर्गवारीतील ३ हजार ४३२ ग्राहकांना नविन वीज जोडणी देण्यात आली आहे. नविन वीज जोडणीत २ हजार ७०३ कृषी ग्राहकाचा समावेश असून औद्योगिक (लघुदाब) वर्गवारीतील ५९१ नविन ग्राहकांना वीज जोडणी देण्यात आली आहे. परिमंडळाअंतर्गत या कालावधीत अमरावती जिल्ह्यात




१८ हजार ६६६ नवीन वीज जोडण्याचा समावेश असून यवतमाळ जिल्ह्यात दिलेल्या नविन वीज जोडण्याची संख्या १४ हजार ६०५ आहे. अमरावती जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे १४ हजार ८६३ घरगुती ग्राहकांना नविन वीज जोडणी देण्यातअसून यवतमाळ जिल्ह्यात १० हजार ६३२ घरे महावितरणने प्रकाशमान केली आहे.वाणिज्यिक वर्गवारी तील ग्राहकात अमरावती जिल्ह्या तील १ हजार ८९० ग्राहक आहेत, तर यवतमाळ जिल्ह्यातील १ हजार ५४२ ग्राहकांचा यात समावेश आहे. कृषी ग्राहकात अमरावती जिल्ह्यातील १ हजार १३३ ग्राहकाचा समावेश असून यवतमाळ जिल्ह्याती १ हजार ५७० ग्राहकाचा यात समावेश आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १७ जानेवारी २०२५

शहर/ग्रामिण


# अपघाती मृत्यू नियंत्रणात आणण्यासाठी पुढाकार घ्यावा

## - जिल्हाधिकारी सौरभ कटियार





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती** –रस्ते अपघातामध्ये वेळेवर वैद्यकीय मदत मिळावी, यासोबतच रस्ता सुरक्षेमध्ये सर्व यंत्रणांनी अपघाती मृत्यू नियंत्रणात आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची सभा जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी कार्यकारी अभियंता रूपा गिरासे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. डी. के. सौंदळे, उपायुक्त गणेश शिंदे आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले, सुरक्षित वाहतुकीसाठी शासनाकडून निधी प्राप्त होत आहे. त्यामुळे या निधीचा चांगला विनियोग होणे गरजेचे आहे. प्रामुख्याने आतापर्यंत रस्ता सुरक्षा अंतर्गत सुचविण्यात आलेल्या सुधारणा प्रत्येक विभागाने प्राधान्याने पूर्ण कराव्यात. याचा अहवाल तातडीने देण्यात यावा. यासोबतच अपघाताची शक्यता असलेल्या ठिकाणांचा शोध घेण्यात यावा. यावर आपल्या स्तरावर उपाययोजना कराव्यात. आवश्यकता भासल्यास जिल्हा प्रशासनही मदत करेल. अपघात घडल्यास जखमींना तातडीने मदत पोहोचले यासाठी प्रयत्न करण्यात यावे. तसेच रूग्णालये आणि पोलिसांच्या मदत क्रमांकाचे फलक लावण्यात यावे.गेल्या वर्षात ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात अपघाती मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे शहरी भागात रस्ता सुरक्षा राबविण्यावर भर द्यावा लागणार आहे. तसेच अपघातातील जखमींना तातडीने औषधोपचार मिळणे गरजेचे आहे. यासाठी पोलिसांनी योग्य ती पावले उचलावीत. पोलिसांनी परिवहन विभागाला अपघाताची माहिती द्यावी, यामुळे अपघाताची कारणे आणि त्यावर करावयाच्या उपायोजनांबाबत संबंधित यंत्रणांना कार्य करता येईल. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासोबतच अपघातातील जखमींना मदत आणि अपघातावरील उपाययोजना करण्यावर यंत्रणांनी भर द्यावा. यामुळे अपघाती मृत्यूची संख्या कमी होण्यास मदत मिळेल.रस्ता सुरक्षा अभियानांर्गत हेल्मेटबाबत जनजागृतीसाठी हेल्मेट रॅली काढण्यात आली. बैठकीपूर्वी जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवली. रस्ता अपघातामध्ये शहरी भागात मृत्यू अधिक होत असल्यामुळे नागरिकांनी हेल्मेटचा उपयोग करावा, असे आवाहन केले. ही रॅली जिल्हाधिकारी कार्यालयातून निघून गर्ल्स हायस्कूल, बसस्थानक, रेल्वे स्टेशन चौक, राजकमल, राजापेठ जयस्तंभ मार्गे निघून शहर वाहतूक शाखा येथे समारोप झाला. प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी सूत्रसंचालन केले.

# तीन दिवसांच्या पोलीस असयुक्तांच्या तक्रार निवारण अभियानात ३,७१९ तक्रारींचे निराकरण

## हेतू परस्पर तक्रारी पेंडिंग ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती** – गुन्हे संबंधिच्या काही तक्रारीवर तत्काळ करवाई न करता त्या तक्रारी प्रलंबित ठेवल्याचा धक्कादायक प्रकार शहर पोलिसांच्या तक्रार निवारण अभियानात उघड झाला. यासंदर्भात दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांवर पोलीस आयुक्त कायदेशीर कठोर कारवाई करणार आहेत. तसेच ज्या अधिकाऱ्यांची बदली झाली आहे त्यांचा डिफॉल्ट रिपोर्ट त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविणार असल्याचे पोलीस आयुक्तांनी सांगितले.

स्थानिक वसंत हॉल परिसरात पोलीस विभागामार्फत १३ ते १६ जानेवारीपर्यंत तक्रार निवारण अभियान राबविण्यात आले. दरम्यान आयुक्तालयातील सायबर पोलीस ठाण्यासह १० ठाण्यातील एकूण ३ हजार ७१९ तक्रारी प्राप्त झाल्यात. यामध्ये एकूण ३ हजार१७२ तक्रारींचे निवारण करण्यात आले. तर ६३० तक्रारीचे येत्या महिन्यात निवारण करण्यात येणार आहे. तसेच ११ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये फसवणूक व विश्वासघाताचे ४ गुन्हे, छेडखानीचे ५ गुन्हे आणि आयटी ॲक्टचे २ गुन्हे दाखल आहेत. तसेच ऑनलाईनच्या ११२ तक्रारी प्राप्त झाल्या. यामध्ये फसवणूक व ब्लॅकमेलच्या घटना समोर आल्या आहेत. या तक्रारीवरसुध्दा पोलीस कारवाई करणार आहेत.निकाली काढण्यात आलेल्या ३ हजार १७२ प्रकरणात अर्जदार व गैरअर्जदार यांना बोलावून त्यांची समजूत काढण्यात आली. तसेच काही प्रकरणात तर आधीच प्रतिबंधक कारवाई झाल्याचे समोर आले.त्यामुळे काही लोकांनी आपल्या तक्रारी मागे घेतल्या तर काहींचे समाधान झाले. तसेच काही प्रमाणात खोट्या तक्रारी प्रथम झाल्या. परंतु काही तक्रारी बरेच वर्षांपासून पेंडिग असल्याचेलक्षात येताच अशा तक्रारदारासोबत संपर्क साधला आणि त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. तेव्हा संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्याने हेतुपुरस्सर तक्रारी पेंडिग ठेवल्याचे स्पष्ट झाले. तेव्हा अशा अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची माहिती घेतली असता आयुक्तालयात कार्यरत पाच अधिकारी व कर्मचारी दोषी आढळले आहेत. तसेच ८ ते १० अधिकाऱ्यांची बदली झाल्याचे समोर आले. त्यामुळे बदली झालेल्या अधिकाऱ्यांचा डिफॉल्ट रिपोर्ट त्यांच्या वरिष्ठांना पाठविण्यात येणार आहे. तसेच आयुक्तालयात कार्यरत दोषी पाच अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यां विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तक्रारीची गंभीरता पाहता संबंधितावर कारवाई होणार आहे. यामध्ये दोषी अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यांवर कारणे दाखवा नोटीस, दंडात्मक कारवाई किंवा इंक्रिमेंटबाद तसेच निलंबनसुध्दा होऊ शकते. त्यामुळे दोषी अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांनी चांगलीच धास्ती घेतली आहे.

# दिव्यांग क्रीडा स्पर्धेत ५४० जणांचा सहभाग, जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

## दिव्यांग मुला-मुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेला सुरुवात




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–**
जिद्दीच्या जोरावर अपंगत्वावर मात करीत दिव्यांग बांधव त्यांच्यातील विशेष शक्तीचा उपयोग करून आज विविध क्षेत्र पादाक्रांत करीत आहेत. आपली शक्तीस्थान ओळखून त्यावर कार्य केल्यास यश निश्चित मिळते. हा आत्मविश्वास सर्व दिव्यांग मुला-मुलींनी बाळगावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या मैदानावर जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग व अशासकीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग मुला - मुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री. कटियार यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते जिल्हास्तरीय दिव्यांग मुला- मुलींच्या क्रीडा स्पर्धेनिमित्त हवेत फुगे सोडून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर दिव्यांग मशाल ज्योत प्रज्ज्वलित करून क्रीडा स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा समाज कल्याण अधिकारी डी. एम. पुंड, दिव्यांग विभाग सहायक सल्लागार पी. डी. शिंदे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले, दिव्यांग मुला-मुलींना प्रशिक्षित करणे हे अत्यंत संवेदनशीलतेचे काम आहे. या विद्यार्थ्यांच्या यशात त्यांच्या शिक्षकांचाही महत्त्वाचा वाटा आहे. दिव्यांग मुला-मुलींमधील विशेष शक्ती ओळखून त्यावर शिक्षक काम करतात. यातून या मुलांना वेगळी ओळख निर्माण करण्यास मदत होते. आज अंध विद्यार्थी देखील आयएएस या स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होवून आपल्या जबाबदाऱ्या सक्षमतेने सांभाळीत आहेत. तसेच पॅरा ओलंपिक स्पर्धेमध्ये देखील दिव्यांग बांधव यशस्वी होत आहेत. स्वतःवर विश्वास ठेवल्यास यश निश्चित मिळते, असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महापात्र यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या शिक्षकांचे कौतुक केले. सर्व कार्यक्रमांमध्ये दिव्यांग मुला - मुलींनी सहभाग घ्यावा. अमरावती जिल्हा क्रीडा क्षेत्रात अग्रेसर आहे. स्पर्धेच्या माध्यमातून केवळ जिल्हा व राज्यस्तरावरच नाव न कमावता राष्ट्रीय पातळीवर देखील पोहोचावे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली . दिव्यांगाच्या विशेष शाळा, कर्मशाळेमधील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा व त्यांना खेळात संधी मिळावी म्हणून जिल्ह्यातील शासकीय मान्यता प्राप्त अनुदानित व कायमस्वरूपी विनाअनुदानित दिव्यांग विशेष शाळा, कर्मशाळेतील विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा १७ जानेवारीपर्यंत चालणार आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिव्यांग शालेय विद्यार्थ्यांनी संचलन करून उपस्थितांना मानवंदना दिली. तीन दिवसीय क्रीडा स्पर्धेत मतिमंद प्रवर्ग, अंध प्रवर्ग, कर्णबधिर प्रवर्ग, अस्थिव्यंग प्रवर्ग तसेच बहु विकलांग प्रवर्गातील ३४ शाळांनी सहभाग नोंदविला असून ५४० दिव्यांग स्पर्धकांनी भाग घेतला आहे. या स्पर्धेमध्ये विविध प्रवर्ग व वयोगटानुसार ५० मीटर, १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर धावणे, लांब उडी, गोळा फेक, सॉफ्ट बॉल, सॉफ्ट जम्प, सॉफ्ट बॉल, पोहणे, तीनचाकी सायकल चालविणे, कुबडी घेऊन धावणे अशा विविध स्पर्धांचा समावेश आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. पुंड यांनी केले. संचालन प्रयास विशेष शाळेचे विशेष शिक्षक ज्ञानेश्वर आमले यांनी केले.

# महापालिकेच्या बाबूंवर होणार कारवाई

## अतिरिक्त आयुक्तांचा मालमत्ता कर वसुली आढावा बैठकीत इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती** – मालमत्ता कर विभागाच्या कार्यासंबंधी गुरुवारी महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांनी आढावा घेतला. जे वसुली लिपिक मालमत्ता कर वसुल करणार नाही त्यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, असा सज्जड इशारा मालमत्ता कर विभागाला देण्यात आला.या बैठकीत चालू आर्थिक वर्षाकरिता मालमत्ता कर अपेक्षित, आय उद्दिष्ट गाठणे हेतू निश्चित केलेले झोननिहाय दैनंदिन उद्दिष्ट प्रत्येक झोनद्वारा गाठणे अपेक्षित आहे. त्याकरिता झोन सहाय्यक आयुक्तांनी जास्तीत जास्त मालमत्ता कर थकीत असलेल्या मालमत्ता धारकाकडे थकीत रक्कम वसूली संबंधी तसेच मालमत्ता कर थकीत असलेल्या मालमत्ताधारकाकडे सहाय्यक आयुक्तांच्या नेतृत्वात मालमत्ता कर वसुली पथकद्वारा वसुलीची उचित कार्यवाही करून घेण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांनी सर्व झोन सहाय्यक आयुक्तांना दिले. तसेच थकबाकीदाराकरिता काढलेल्या मालमत्ता कर वसुली वारंट अंतर्गत कार्यवाही पूर्ण करुन थकीत मालमत्ता कर वसुल करण्याचे निर्देश सर्व झोन सहाय्यक आयुक्तांना देण्यात आले. १९४० थकबाकीदारांना महानगरपालिकेतर्फे जप्तीची नोटीस पाठविण्यात आली आहे.मालमत्ता कराचा भरणा न करणाऱ्यांना मोठ्या थकीत धारकांना जप्तीची नोटीस पाठविण्याचे निर्देश मनपा अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांनी आढावा बैठकीत दिले. थकीतकर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्यास प्रशासकीय कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा अतिरिक्त आयुक्तांनी दिला.यावेळी मालमत्ता धारकांनी लवकरात लवकर मालमत्ता कर भरुन सहकार्य करावे व जप्ती टाळावी असे आवाहन महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांनी केलेआहे. या आढावा बैठकीत उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सहाय्यक आयुक्त दिप्ती गायकवाड, सहाय्यक आयुक्त सुभाष जानोरे, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी, कर निरीक्षक, कर वसुली लिपिक उपस्थित होते

# घरातील कापसाच्या गंजीला आग शेतकऱ्याचा २० क्विं. कापूस खाक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अंजनगाव सुर्जी–** माळीपुरा स्थित शेतकऱ्याच्या घरातील कापसाच्या गंजीला आग लागल्याने २० क्विंटलच्या आसपास कापूस जळून नुकसान झाले आहे.

अंजनगाव सुर्जी शहरातील माळीपुरा येथील शेतकरी गणेश सुभाषराव भुस्कट यांच्या घरातील कापसाच्या गंजीला आग लागल्याची घटना १५ जानेवारी २०२५ रोजी दुपारच्या सुमारास घडली.हातातोंडाशी आलेला घास एकाएकी आगीच्या भक्ष्यस्थानी बघून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.धुराचे लोट पाहून शेजार्यांनी आग विझविण्यासाठी पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. ही आग शॉटसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला जात असून घटनेसंबंधित महसुल विभागाने घटनास्थळाचा पंचनामा केला आहे.

# पुनर्वसित गावात मूलभूत सुविधा पुरविल्यानंतर स्थलांतरण करा

## पेढी प्रकल्पबाधित पाच गावांच्या आढावा बैठकीत खा. बळवंत वानखडे यांचे निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–**
भातकुली तालुक्यातील निम्न पेढी सिंचन प्रकल्पाची घळभरणी महसूल प्रशासन तथा जलसंपदा विभागामार्फत जून २०२५ मध्ये जाहीर करण्यात आली असून प्रकल्पबाधितांना स्थलांतरणाच्या सूचना वजा आदेश दिले आहेत. पुनर्वसनस्थळी पुरेशा नागरी सुविधा नसताना तेथे राहायचे कसे, घर बांधायचे कसे, असा प्रश्न उपस्थित करत 'आधी योग्य मूलभूत सुविधा पुरवा, नंतरच स्थलांतरण, असा पवित्रा प्रकल्पबाधितांनी घेतला आहे. याबाबत अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रकल्प तसेच पुनर्वसनाशी संबंधित अधिकाऱ्यांशी आढावा बैठक घेऊन मूलभूत सुविधा पुरवल्यानंतरच पाच गावांचे स्थलांतरण करा असे निर्देश दिलेत.अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र.१ अमरावती विभागाच्या लेटलतिफ कारभारामुळे बुडित क्षेत्रातील पाचही गावांच्या पुनर्वसनस्थळी पुरेशा मूलभूत नागरी सुविधा तिथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. अशातच भातकुलीच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी २ जानेवारी बुडित क्षेत्रातील हातुर्णा, कुंड सर्जापूर,गोपगव्हान, अळणगाव सातुर्णा या पाच गावातील सरपंचांना पुनर्वसनात स्थलांतर करण्यासाठी नोटीस पाठविल्या. परंतु पुरेशा मूलभूत सुविधा उपलब्ध नाल्याने सदर गावात राहायचे कसे अशी समस्या या ग्रामपंचयातीमार्फत खासदार बळवंत वानखडे यांच्याकडे मांडल्या होत्या. त्याअनुषंगाने ही बैठक पार पडली.

यात या पाचही गावात प्रामुख्याने मूलभूत सुविधा संपूर्णता निकामी झाल्या आहेत. नागरी सुविधांचा अभाव असून रस्ते, नाल्या, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी, सभागृह, पाण्याची टाकी, पाणीपुरवठा पाईपलाईन, प्रवासी निवारा, गोडाउन, सुस्थितीत नसून याबाबत मोठ्या प्रमाणात गावकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाला. तसेच भूखंड वाटप, घरकुल योजना याबातही मोठ्या प्रमाणांत तक्रारी प्राप्त झाल्या. संपूर्ण मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्याशिवाय पाचही गावातील नागरिकांना स्थलांतरणाची जबरदस्ती करू नये, असे निर्देश खासदार बळवंत वानखडे यांनी बैठकीत दिले.

तसेच राज्यस्तरावर जाहीर झाल्याप्रमाणे सरसकट पुनर्वसीत गावांना हेक्टरी ५ लक्ष रुपयांची रक्कम गांव सोडायच्या अगोदर देण्यात यावे. अकोला जिल्ह्यातील उमा बॅरेज (ता. मूर्तीजापूर) लंघापूर पोहीयेथे पुनर्वसीत पॅकेजनुसार ८.२६ लक्ष प्रत्येक कुटुंबाला देण्यात आले. त्याच धर्तीवर जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांना लाभ देण्याबाबतच्या सूचना सदर बैठकीत देण्यात आल्या. या बैठकीला जिल्हाधिकारी सौरभ कटियार, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपविभागीय अधिकारी मीनू पी. एम. तहसीलदार विजय लोखंडे, कार्यकारी अभियंता पिंजरकर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष हरिभाऊ मोहोड, नीलेश मानकर- सरपंच कुंड सर्जापुर, गौतम खंडारे- सरपंच अळणगाव, अनिल तायडे तसेच नागरिक उपस्थित होते.-

# मराठी भाषेच्या संवर्धनासाठी तीचा सर्वत्र वापर आवश्यक – सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि१७अमरावती–** मराठी भाषेला २ हजार वर्षापूर्वीचा इतिहास असून केंद्र सरकारने वर्ष २०२४ ला मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. भाषा ही अभिव्यक्त होण्याचे माध्यम असून आपली संस्कृती टिकविण्यासाठी तसेच मातृभाषेचे संवर्धन होण्यासाठी तीचा सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वापर होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रभारी विभागीय आयुक्त सौरभ कटियार यांनी केले.मराठी भाषा पंधरवडा निमित्त येथील विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. कटियार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. अपर आयुक्त गजेंद्र बावणे, उपायुक्त रमेश आडे, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, श्रीमती गीता वंजारी, तुकाराम टेकाडे, संतोष कंदेवार तसेच प्रा. राजेश मिरगे व प्रा. श्रीमती नंदा नांदूरकर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.



मराठी भाषा पंधरवडा निमित्त पहिल्या दिवशी मराठी भाषा वाचन व विवेचन या विषयावर प्रा. राजेश मिरगे व प्रा. नंदा नांदूरकर यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते.मराठी भाषा वाचन व विवेचन या विषयावर प्रा. मिरगे यांनी व्याख्यान दिले. ते म्हणाले की, मराठी भाषेला २ हजार वर्षापूर्वीचा इतिहास असून केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा हा दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत साजरा केला जातो. मराठी भाषेचे संवर्धन आणि राज्यातील सर्व क्षेत्रात मराठी भाषेचा वापर वाढवणे हा या पंधरवड्याचा उद्देश आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ती भाषा किमान दीड ते दोन हजार वर्षे प्राचीन असायला हवी. त्या भाषेतील समृद्ध ग्रंथ व अन्य साहित्य परंपरा असावी. ते मूळ त्याच भाषेतील लिहिलेले असावे, अनुवादित नसावे. भाषेचा प्रवास अखंडित असावा आणि प्राचीन व सध्याच्या भाषेतील नाते सुस्पष्ट असावे, अशा सर्वसाधारण अटी आहेत. मराठी भाषेने हे सर्व मापदंड पूर्ण केले असल्याने तीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. यामुळे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी अनेक फायदे होणार आहेत. या निर्णयामुळे मराठी भाषेच्या अभ्यासाला प्रोत्साहन मिळेल. संशोधन आणि साहित्यसंग्रह करण्यास चालना मिळेल, तसेच शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मराठी भाषेचे महत्व वाढेल.

भारतातील प्रमुख भाषांपैकी मराठी भाषा एक आहे. महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांची ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही जगातील पंधरावी आणि भारतातील चौथी भाषा आहे. मराठी साहित्याचा इतिहास फार मोठा आणि जुना आहे. याच भाषेत आपली संत परंपरा आढळून येते. मराठी भाषेतील ग्रंथधनाचे पुरावे बाराव्या-तेराव्या शतकापासून आढळतात. लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू या आद्य ग्रंथांनी मराठी भाषेची प्राचीनता व समृध्दता सिध्द केली आहे. मराठी भाषेने आपल्याला कुसुमाग्रज, बा.भ.बोरकर, शांता शेळके, केशवसुत, गो.नि.दांडेकर, प्र.के. अत्रे, पु. ल. देशपांडे, सुरेश भट, बहीणाबाई चौधरी यासारखे अनेक मोठमोठे लेखक दिले. रणजित देसाई, शिवाजी सावंत, बाबासाहेब पुरंदरे यासारखे ऐतिहासिक साहित्यिक दिले. या लेखक व साहित्यिकांचे ग्रंथ, कांदबरी व पुस्तके आजच्या तरुण पिढीने वाचयला उपलब्ध करुन द्यावीत. मराठी सहित्याची आजच्या तरुण पिढीला ओळख करुन देणे गरजेचे आहे. केवळ आपल्या बोलण्यातूनच नव्हे तर आपल्या आचार-विचारातून देखील मराठी भाषा दिसायला हवी, तरच मराठी भाषा खऱ्या अर्थाने समृध्द होईल.मोबाईलच्या या युगात मुलांना वाचनाची गोडी लागावी, यासाठी पालकांनी बालसाहित्यांची त्यांना ओळख करुन देणे आवश्यक आहे. पुस्तकातून ज्ञान मिळते ही गोष्ट लहाणपणीच मुलांना शिकविली पाहिजे. त्यांच्यात वाचन संस्कृती रुजविली पाहिजे. विद्यार्थ्यांनी टिळक, आगरकर, गोखले, फुले, शाहू, डॉ. आंबेडकर यांची पुस्तके व साहित्य वाचायला हवी. नट सम्राट, मोरुची मावशी या सारखी दर्जेदार मराठी नाटके, श्यामची आई, छावा, पाणीपत, मृत्यूंजय, युगंदर यासारख्या ऐतिहासिक व बोधपर कांदबऱ्या वाचून त्यातील विचार आचारणात आणावे. तंत्रज्ञान मानवी जीवनावर कशा पध्दतीन हावी होत आहे, यासंदर्भातील मिलींद किर्ती लिखीत तंत्रज्ञानाच मायाजाल यासारखी पुस्तके, साहित्य वाचून मराठी भाषेचा गौरव व व्यापक प्रचार-प्रसार करावा. मराठी भाषेविषयी अभिमान बाळगावा, असे डॉ. मिरगे यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले.कार्यक्रमाचे उत्तम सुत्रसंचालन नायब तहसीलदार श्याम देशमुख यांनी केले तर तहसीलदार श्रीमती काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी विभागीय आयुक्त कार्यालयातील सर्व अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्योजकांना खंडणी मागणाऱ्यांची आता खैर नाही

## एमआयडीसी येथील उद्योजक, कामगार प्रतिनिधींची पोलिसानी घेतली बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती –** नांदगावपेठ एमआयडीसीमध्ये उद्योजक, व्यवस्थापक आणि कामगारांमधील सततचा वाद पाहता पोलीस उपायुक्तांनी नांदगावपेठ एमआयडीसीमध्ये उद्योजक व कामगार प्रतिनिधींची बैठक घेतली. कमगारांसह उद्योजकांना कुठलाही त्रास झाला किंवा खंडणी मागितल्यास संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदवून कठोर कारवाई केली जाईल, असे पोलीस उपायुक्तांनी स्पष्ट केले.

बैठकीमध्ये एमआयडीसी प्लांट हेड व एचआर मॅनेजर यांच्यासोबत शासनाच्या सर्व अधिकाऱ्यांनी विस्तृत चर्चा केली. कंपनीच्या अडचणी जाणून घेतल्या. कंपनीमधीलमहिला कामगार यांच्या सुरक्षेसंबंधाने उपाययोजना कराव्यात. अग्निपासून सुरक्षेकरिता कंपनीचे फायर ऑडीट वेल्फेअर पहावे याबाबत कामागार कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या. कंपनीमध्ये कोणतीही घटना घडली तर कंपनीचे प्लांट हेड यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून कंपनीशी संबंधित सरकारी यंत्रणेला तात्काळ माहिती द्यावी. बाहेरील कोणीही व्यक्ती कंपनीमध्ये येऊन गुंडागर्दी करून धमकावित असेल किंवा कंपनीच्या कामकाजामध्ये कोणी बाधा निर्माण करत असेल तसेच खंडणी मागत असेल तर पोलीस स्टेशनला रितसर तक्रार नोंदवावी, अशा लोकांविरुध्दकायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे यावेळी सांगण्यात आले. बैठकीला पोलीस उपायुक्त सागर पाटील यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळी उपस्थित सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर, पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे, एम. आय. डी. सी. येथील वस्त्रोद्योग समूह, लघुउद्योग व शासनाचे अधिकारी सुधीर अमृतकर, एच.जी. राठोड, पी. एम. गंपावार, ओ. एस. वाघमारे, फायर विभागाचे आकाश कांबळे, लेबर ऑफीसर पी. एम. महल्ले, घनश्याम दंदे, अन्न-औषधी प्रशासन विभाग, प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे जी.डी. बेहरे, वीज महावितरण, डॉ. एस. राऊत उपस्थित होते.




# केसगळतीचे रुग्ण दोनशेच्या घरात

## ‘आयसिएमआर’ चे पथक शेगावात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ बुलढाणा : –** सर्वेक्षण आणि तपासणीसाठी येणाऱ्या वैद्यकीय पथकांच्या भेटीचा धडाका कायम असताना रुग्ण संख्येतील वाढही कायम असल्याचे दुर्दैवी चित्र शेगावात आहे. आजअखेर शेगाव तालुक्यात केसगळती रुग्णांची संख्या १९० वर गेली आहे. नांदुरा तालुक्यातील रुग्णसंख्या सातवर स्थिर असली तरी एकूण रुग्णसंख्या दोनशेच्या घरात म्हणजे १९७ पर्यंत पोहोचली आहे.



८ जानेवारीच्या आसपास या अनामिक व तितक्याच विचित्र आजाराचे रुग्ण प्रकाशात आले. यानंतर जिल्हा आरोग्य विभागाने केलेल्या सर्वेक्षणमध्ये तीन ते चार गावांत ६१ रुग्ण आढळून आले. प्रारंभी हा आजार एका प्राथमिक आरोग्य केंद्रापुरता आणि तीनचार गावांपूरता मर्यादित होता. मात्र, आठवड्यातच या आजाराने चार प्राथमिक आरोग्य केंद्रांतील बारा गावांपर्यंत हात पाय पसरले. आठ जानेवारीला ६१ रुग्ण आढळल्यावर दुसऱ्या दिवशी ३५, १० जानेवारीला २७, नंतर १२, ८, ६, २२, १० आणि आज १६ जानेवारीला आणखी ९ रुग्ण आढळले आहेत. आजअखेर शेगाव तालुक्यातील ११ गावांतील रुग्णसंख्या १९० पर्यंत पोहोचली आहे. नांदुरा तालुक्यातील वाडी या गावातील संख्या सातवर स्थिर असून दोन्ही तालुक्यांतील रुग्णसंख्या एकूण १९७ पर्यंत पोहोचली आहे.

# धक्कादायक! वर्धा जिल्ह्यातील भूगर्भात नायट्रेटयुक्त पाणी, कर्करोगासह विविध आजार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ वर्धा –** पाणी म्हणजेच जीवन. तेच दूषित असेल तर निरोगी जीवनाचे काय, असा प्रश्न पडणार. शासकीय पातळीवर शुद्ध पेयजल पुरवठा केल्या जाणे अपेक्षित आहे. मात्र, तसे होत आहे का, याचा तपास आवश्यक ठरतो. भुजल विभागाने नुकतेच एक सर्वेक्षण केले. त्याचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे.या अधिकृत शासकीय अहवालनुसार जिल्ह्यातील ४२ गावात तपासण्यात आलेल्या पाण्याच्या नमुन्यात नायट्रेट आढळून आले आहे. जल तपासणीत जिल्ह्यातील ८८० गावात तपासणी झाली. १ हजार १४४ पाणी स्रोत तपासणीस पाठविण्यात आले.



त्यापैकी ४२ गावातील ९५ पाणी स्रोत अशुद्ध आढळून आले. म्हणजे त्यात नायत्रेट आढळले.असे नायट्रेटयुक्त पाणी पिल्यास ब्लु बेबी सिंड्रोम या आजाराची लागण होवू शकते. हा एक दुर्मिळ रक्तविकार समजल्या जातो. त्यात हिमोग्लोबिनचा एक घटक मेथेमोग्लोबिन झपाट्याने वाढू लागतो. परिणामी, शरीरातील प्राणवायुचे प्रमाण घटू लागते. प्रामुख्याने सहा महिन्याच्या आतील बाळास त्याचा सर्वाधिक धोका संभवतो. हा धोका लक्षात घेऊन भुजल विभागाने या स्रोतातील पाणी न पिण्याचा इशारा दिला आहे. हा पाणी स्रोत सोडून अन्य पर्याय शोधण्याचा सल्ला पण दिला.

# धारणी पंचायत समिती चॅम्पियन ऑफ चॅम्पियन

## प्राथमिक, माध्यमिक व सांस्कृतिक विभागात दबदबा

### सांस्कृतिक कार्यक्रमात धामणगाव तर निदर्शनेमध्ये तिवसा पंचायत समिती अव्वल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती–** श्री शिवाजी शारीरिक महाविद्यालयाच्या प्रांगणात तीन दिवसीय जिल्हा स्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप झाला. या महोत्सवात धारणी पंचायत समितीला जनरल, प्राथमिक व माध्यमिक चॅम्पियन चषकाचा बहुमान मिळाला. शिक्षण विभाग, जिल्हा परिषद अमरावतीतर्फे या शालेय क्रीडा महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा जिल्हा परिषदेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहरे यांच्या हस्ते झाला. दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमात धामणगाव रेल्वे तर निदर्शनेमध्ये तिवसा पंचायत समिती अव्वल ठरली.



जिल्हा स्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या पारितोषिक वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहरे हे होते. तर व्यासपिठावर माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी निखिल मानकर,अनिल कोल्हे, प्राथमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने चांदूर बाजारचे गटशिक्षणाधिकारी वकार अहमद, धारणीचे सुनील खडे, चिखलदराचे रामेश्वर माळवे, तिवसाचे डॉ.नितीन उंडे, चांदुर रेल्वेचे संदीप बोडखे,नांदगाव खंडेश्वरच्या कल्पना ठाकरे, वरूडचे विनोद गाढे, अंजनगावचे श्री.भ. गीरासे,मोर्शीचे गुणवंत वरघट,दर्यापूर येथील संतोष घुगे,भातकुली येथील दीपक कोकतरे,धामणगाव रेल्वे येथील सपना भोगावकर,अमरावती येथील धनंजय वानखडे,अचलपूर येथील राम चौधरी,क्रीडा संयोजक प्रवीण खांडेकर,शिक्षण विस्तार अधिकारी गंगाधर मोहने,संगीता सोनोने,मोहम्मद अशफाक व आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्तविक क्रीडा संयोजक व शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण खांडेकर यांनी केले. तर संचालन सुनीता लहाने,अजय अडिकने व मनीष काळे यांनी केले.आभार प्राथमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने यांनी मानले.

प्राथमिक विभागात कबड्डी मुले मध्ये नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोहगाव शाळा विजयी ठरली तर धारणी तालुक्यातील उकुपाटी शाळा उपविजयी झाली. कबड्डी मुलीमध्ये उकुपाटी, धारणी विजयी झाली तर चिखलदरा तालुक्यातील आडनद शाळा उपविजयी झाली. लंगडी मध्ये चिखलदरा तालुक्यातील केली शाळा विजयी तर धारणी तालुक्यातील खाऱ्या शाळा उपविजयी ठरली.



तसेच माध्यमिक विभागात कबड्डी मुले- खेळ प्रकारात धश्ररणी तालुक्यातील उकूपाटी शाळा विजयी व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सालोड उर्दू शाळा उपविजयी ठरली.कबड्डी मुली मध्ये धारणी तालुक्यातील चीपोली शाळा विजयी तर धामणगाव तालुक्यातील बोरगाव निस्ताने शाळा उपविजयी झाली.खो खो मुले खेळ प्रकारात धारणी तालुक्यातील मांसुधावडी शाळा विजयी झाली तर अमरावती तालुक्यातील पिंपळखुटा शाळा उपविजयी ठरली. हॉलीबॉल मुले मध्ये चांदूर रेल्वे तालुक्यातील जावरा शाळा विजयी आणि दर्यापूर तालुक्यातील दारापुर उर्दू शाळा उपविजयी झाली.हॉलीबॉल मुली मध्ये चटवा बोड,धारणी विजयी आणि भातकुली उर्दू शाळा उपविजयी झाली.टेनिक्काईट दुहेरी मुली मध्ये चांदूर बाजार तालुक्यातील सैफिनगर उर्दू शाळा विजयी तर धारणी तालुक्यातील चटवा बोड उपविजयी झाले.बॅडमिंटन मुले दुहेरी मध्ये तिवसा तालुक्यातील जावरा शाळा विजयी व मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर उर्दू शाळा उपविजयी ठरली.सांस्कृतिक कार्यक्रमात प्रथम क्रमांक धामणगाव रेल्वे पंचायत समितीने प्राप्त केले.तर द्वितीय क्रमांक अमरावती पंचायत समितीने पटकाविला.निदर्शने मध्ये तिवसा पंचायत समिती प्रथम क्रमांक तर द्वितीय क्रमांक अमरावती पंचायत समितीने प्राप्त केला.या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी सर्व नियोजन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनेचे पदाधिकारी,सर्व मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, साधनव्यक्ती,विशेष शिक्षक यांनी कर्तव्य बजावले.असे प्रसिद्धी समितीचे प्रमुख विनोद गाढे,विनायक लकडे,शकील अहमद,राजेश सावरकर,श्रीनाथ वानखडे यांनी कळविले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतिश नांदने,दिनेश देशमुख,पंकज देशमुख,मनोज चौरपगार,राजु खिराडे,राजेश नाईक,मंगेश खेरडे,प्रशांत पवार,धनराज कुंजेकर,भुषण बागडे,डॉ. आशिष पांडे,किसन राणे,,मनोज खोडके, मनिष काळे, सचिन वावरकर, चंदू रामटेके, उज्वल पंचवटे, कैलास कावनपुरे, श्रीधर बालपांडे, सरफराज खान, संजय कोकाटे, सतीश टाले, विकास भडांगे, राजेंद्र झाकर्डे, प्रवीण जावरकर, राजेंद्र दिक्षित आदींनी विशेष कर्तव्य बजावले.

# लेखा व कोषागारे विभागाच्या कला व क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ अमरावती.–** संचालनालय लेखा व कोषागारे कल्याण समिती व्दारे अमरावती विभागीय कला व क्रीडा स्पर्धा २०२५ चे आयोजन दि. ११ व १२ जानेवारी, २०२५ रोजी वाशिम येथे करण्यात आले होते. विभागातील अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम व बुलडाणा या पाच जिल्हयातून बहुसंख्य स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला होता.

जिल्हा क्रीडा संकुल येथे विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. विभागीय स्तरावर वैयक्तिक, दुहेरी तथा सामुहिक स्पर्धा यावेळी घेण्यात आल्या त्यात धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, थाळीफेक, चालणे, पोहणे, कॅरम, बुध्दिबळ, टेबल टेनिस, बॅडमिंटन, हॉलीबॉल, क्रिकेट, थ्रो बॉल, खो-खो व रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या.सांस्कृतिक स्पर्धेमध्ये एकेरी महिला गायन या प्रकारात अमरावतीच्या वरिष्ठ कोषागार अधिकारी, श्रीमती शिल्पा पवार यांनी प्रथम स्थान मिळवले असून दुहेरी माहिला गायन स्पर्धेमध्ये श्रीमती. तृप्ती तिप्पट व श्रीमती. भारती वालचाळे यांनी प्रथम स्थान मिळवले. सामूहिक नृत्य प्रकारात अमरावती संघाने व्दितीय स्थान प्राप्त केले.सदर क्रीडा स्पर्धेमध्ये अमरावती जिल्हा क्रिकेट या प्रकारात विजेता ठरला तर खो-खो महिला संघाने प्रथम स्थान पटकावले तसेच थ्रोबॉलमध्ये मध्ये महिला संघ व्दितीय ठरला.धावणे १०० मीटर या प्रकारात महिला गटातून अमरावतीच्या आरती जनबंधू यांनी व्दितीय स्थान पटकाविले. धावणे २०० मीटर या प्रकारात महिला गटातून प्रिया कापसे यांनी प्रथम तर पुरुष गटातून श्रीकार माटे यांनी व्दितीय क्रमांक पटकावला. तसेच १०० बाय ४



रिले प्रकारातून पुरुष गटातून अमरावती संघ उपविजेता ठरता यामध्ये भूषण जोशी, रुपेश जयपुरे, मयूर देशमुख व श्रीकार माटे यांनी सहभाग नोंदविला या प्रकारात अमरावती महिला संघानेसुध्दा व्दितीय क्रमांक पटकावला असून यामध्ये भारती जनबंधू, कोमल गोसावी, प्रतिभा पवार व जागृती चौधरी यांनी सहभाग नोंदविला. नयना सोलव यांनी थाळी फेक महिला प्रकारात प्रथम तर लांब उडी महिला प्रकारात व्दितीय क्रमांक पटकावला. चालणे तीन किमी प्रकारातून सारिका कोरान्ने यांनी प्रथम क्रमांक पटकावला. पोहणे ५० मीटर व १०० मीटर या दोन्ही प्रकारात जयदेव देशपांडे लेखाधिकारी यांनी प्रथम स्थान पटकाविले. कॅरम पुरुष गटातून चंदन गजभिये व महिला गटातून प्रिया करडे यांनी व्दितीय स्थान पटकावले. कॅरम दुहेरी महिला यामध्ये प्रिया करडे व राजश्री भोकरे यांचा संघ उप विजयी झाला. बुध्दीबळ मिश्र या प्रकारात राजश्री भोकरे यांनी प्रथम स्थान मिळविले. टेबल टेनिस एकेरी पुरुष यामध्ये अमरावतीचे अमोल ईखे सहा. संचालक यांनी व्दितीय स्थान पटकावले तर टेबल टेनिस पुरुष दुहेरी यामधून अमोल ईखे व विकी रोडे यांचा संघ उप विजयी झाले. टेबल टेनिस दुहेरी महिला यामधनु प्रिया करडे व राजश्री भोकरे यांनी व्दितीय स्थान मिळविले. बॅडमिंटन एकेरी महिला या गटातून नयना सोलव हया उप विजेत्या ठरल्या. बॅडमिंटन दुहेरी महिला यामध्ये नयना सोलव व प्रिया करडे यांनी व्दितीय स्थान मिळविले.

रांगोळी स्पर्धेत स्त्री सक्षमीकरण या विषयावर रांगोळी काढून अमरावतीच्या यामिनी खरड यांनी प्रथम क्रमांक मिळविला.सदर अमरावती विभाग स्तरिय क्रीडा स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यामध्ये श्रीमती प्रिया तेलकुंटे सहसंचालक लेखा व कोषागारे. मा. गायकवाड साहेब सहसंचालक स्थानिक निधी अमरावती विभाग मा. श्रीमती शिल्पा पवार वरिष्ठ कोषागार अधिकारी, अमरावती यांनी अथक परिश्रम घेतले.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथे श्री संत गजानन महाराज महापारायण सोहळा









**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

अमरावती येथील पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअममध्ये करण्यात आले आहे. या प्रतिष्ठित सोहळ्याचा शुभारंभ देशाचे माजी राष्ट्रपती व भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते झाला असून या महोत्सवामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक आणि राजकीय क्षेत्रातील जागतिक ख्यातीच्या व्यक्तिमत्त्वांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दरवर्षी मिळते. विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पना आणि प्रकल्प सादर करण्यासाठी टेक्लॉन्स २०२५ हे एक अभूतपूर्व व्यासपीठ आहे. पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मधील विविध क्लबच्या विद्यार्थ्यांच्या या महोत्सवाच्या आयोजनामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग आहे.त्याच उद्देशाने आज श्री संत गजानन महाराज महापारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता.सांस्कृतिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून श्री संत गजानन महाराज महापारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सौ. विद्याताई पडवळ (मुंबई) यांच्या सुमधुर वाणीतून मुखोद्गत पारायणा चे वाचन करण्यात आले. या पारायणा करीता मोठ्या प्रमाणात भक्तगणांनी नोंदणी केली होती त्याचप्रमाणे श्रींचे सेवेकरी म्हणून महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला. पारायणाच्या समाप्तीनंतर आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

## 'सुनो बेटी शस्त्र उठालो... हर बार तुम्ही बचाने पापा नही आयेंगे !' जिल्ह्यातून प्रथम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७धामणगाव रेल्वे**

जिल्हास्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत तालुक्यातील झाडा येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेने सांस्कृतिक कार्यक्रमात प्रथम पटकावला.याबद्दल सर्वांचे अभिनंदन होत आहे.



पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सपना भोगावकर,गटसमन्वयक धीरज जवळकार,शिक्षण विस्तार बाळासाहेब मुंदे,मोहन देशमुख,केंद्रप्रमुख चिंचोली शरद कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक उर्मिला थोरात,शिक्षक, तेजेश राठोड, जयश्री पेठे, अर्चना आसोले, मानसी कडे यांच्या संकल्पनेतून 'सुनो बेटी शस्त्र उठालो...' ही नाटिका अमरावती येथील जिल्हास्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात सादर केली.याला प्रथम क्रमांक मिळाला.

या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी स्त्रियांच्या व्यथा अत्याचार तसेच सुरक्षा आपल्या कलाविष्कारा मार्फत सादर केल्या त्याचबरोबर बदलापूरची चिमुकली, कलकत्याची डॉक्टर, दिल्लीची निर्भया व हैदराबादची सायंटिस्ट अशा घटना व प्रसंग सादर केले.समाजात असे कृत्य घडून आणणारे राक्षसी प्रवृत्तीची लोकं आपण ओळखू शकत नाही हे घृणास्पद कृत्य करून काही न केल्याचा मुखवटा घालून फिरतात अशा राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांन पासून आपल्या मुली वाचवायच्या असतील तर ज्याप्रमाणे आपण मुलीला स्वतःच्या पायावर उभे करण्याचे स्वप्न पाहतो त्याचप्रमाणे तिला स्वतःचे रक्षण स्वतः करता यावे याची सुद्धा लहानपणापासून तयारी ठेवायला पाहिजे जेणेकरून मुलगी डॉक्टर इंजिनियर बनण्याबरोबरच काली सुद्धा बनेल.जर निर्भयासारखा प्रसंग आलाच तर ती त्या नराधमाचा वध करेल.

मै अब निर्भया नही बनूंगी जो अब मारी जाऊंगी मै धर रूप काली का दुष्टो के सर काटुंगी या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी झाडा गावचे सरपंच मंगेश बोबडे सरपंच, उपसरपंच रोशन कोंबे, ग्रामपंचायत सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेंद्र कराळे ,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांचे सहकार्य लाभले.

## शहानूर सिंचन प्रकल्पाचा कालवा फुटल्याने रब्बी पिकांचे नुकसान

### बोराळा, जवलापूर शिवारातील शेती खराब; शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अचलपूर**

तालुक्यातील बोराळा, जवलापूर शेत शिवारातील शेतकऱ्यांच्या शेतात रब्बी पिके आहेत. या शेताला लागून शहानूर सिंचन प्रकल्पाच्या मध्यम व लघु पाटबंधारे विभागा अंतर्गत कालव्यातून शेतीसाठी पाणी सोडल्या जाते. दरम्यान हा कालवा फुटून संपूर्ण पाणी काठावरील शेतकऱ्यांच्या शेतात गेल्याने मोठ्या प्रमाणात नासाडी झाली आहे.



**दुरुस्तीचे काम लवकरच**

खालच्या भागातील शेतकऱ्यांनी पाण्याची मागणी केली होती. त्यानुसार कालव्यातून पाणी सोडण्यात आले होते. बोराळा परिसरात कालवा नादुरुस्त झाल्याने शेतातील पिकाचे नुकसान झाले आहे. लवकरच कालवा दुरुस्तीचे काम केले जाईल.

**–सोमेश आडे, अभियंता, शहानूर सिंचन प्रकल्प**

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार कालव्याच्या माध्यमातून पाणी वितरीत केल्या जाते. मागणी नसतानाही अचानक कालव्यातून पाणी सोडण्यात आले. त्यामुळे अचानकच हे संकट ओढवले. वितरिकेत पाणी सोडण्याआधी साफसफाई करणे महत्त्वाचे असते. शिवाय शेतकऱ्यांना माहिती देणेही आवश्यक असते. परंतु असे काहीही झाले नाही. कुठलीच माहिती न देता बोराळा गट नं. १७/१, १७/२ व मौजे जवलापूर येथील गट नं. ६२,६३ मध्ये जादा पाणी सोडण्यात आले. परिणामी त्या भागातील शेतकऱ्यांच्या हरभरा पिकाचे नुकसान झाले आहे.

बाळासाहेब रायबोले यांची ११ ते १२ एकर शेती पाण्याखाली आल्याने त्यांचे ५ ते ६ लाख रुपयांचे नुकसान झाले. तर शुभम कडू, उमेश इंगळे, अनिल कडू, भुजंगराव कडू, सुनील कडू, गफुर शाह, सुरेश कराळे, मदन कडू, तुकाराम रायबोले यांच्या शेतातील पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याबाबत शेतकऱ्यांनी निवेदन देऊन तत्काळ योग्य ती पीक भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे.


**वितरिका सफाईत घोळ**

शहानूर सिंचन प्रकल्पांतर्गत येणाऱ्या वितरिकांची कुठल्याच प्रकारे साफसफाई केली जात नाही. मात्र दरवर्षी साफसफाईच्या नावावर लाखो रुपयाच्या बिलाचे शोधन केले जाते. त्यामुळे या सर्व बाबीची चौकशी होणे गरजेचे आहे. जेणेकरून दोषीवर योग्य ती कारवाई झाल्यास पुढे अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होणार नाही.

## तीन वर्षीय चिमुकलीवर ६५ वर्षीय नराधमाचा अत्याचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ येवदा**

येवदा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका तीन वर्षीय चिमुकलीवर ६५ वर्षीय नराधमाने अत्याचार केल्याची खळबळजनक घटना गुरुवारी (दि. १६) घडली. या प्रकरणात येवदा पोलिसांनी नराधमाला गुरुवारी रात्री ताब्यात घेतले आहे.



प्रकाश भगवान पुंडकर (६५ रा.पोलिस ठाणे येवदा हद्दीतील) पीडित चिमुकली ही खेळत होती. त्यावेळी या नराधमाने चिमुकलीला स्वतःजवळ बोलावले. चिमुकली गेली असता त्याने घरात नेऊन चिमुकलीवर अत्याचार केला. या प्रकाराने चिमुकली घाबरली आणि रडत रडत घरी गेली. दुसरीकडेमुलगी दिसत नसल्यामुळे चिमुकलीची आई तिचा शोध घेत होती. दरम्यान चिमुकली दिसताच तिने घडलेला प्रकार आईला सांगितला. तिच्या शरीरावर रक्तसुद्धा होते. या प्रकरणी चिमुकलीच्या आईने तातडीने येवदा पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी प्रकाश पुंडकर या नराधमाविरुद्ध बलात्कार तसेच पोस्को कलमान्वये गुन्हा दाखल केला. यादरम्यान मात्र पुंडकर गावातून पसार झाला होता. पोलिसांनी दिवसभर त्याचा शोध घेतला. दरम्यान गुरुवारी रात्री जंगल परिसरात तो असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी रात्रीदरम्यान त्याला ताब्यात घेतले.

## करिना थापाला विद्यापीठातर्फे जिजाऊंची लेक पुरस्कार प्रदान

### अतुलनीय कार्यातून अमरावतीचा नावलौकिक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत एम. ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन अभ्यासक्रमाद्वारे राष्ट्रमाता जिजाऊ जयंती उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कारप्राप्त करिना थापा हिला 'लेक जिजाऊची' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



याप्रसंगी उपस्थित वक्त्यांनी विविध उदाहरणांद्वारे राजमाता जिजाऊ यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. करिना थापाच्या समयसूचकतेमुळे अमरावती शहरातील कठोरा परिसरातील जय अंबा अपार्टमेंटला लागलेल्या भीषण आगीत ७० लोकांचे प्राण वाचले. तिच्या या कर्तबगारीचा संपूर्ण देशाला परिचय झाला व अमरावतीचे नाव संपूर्ण भारतात उंचावले.या वेळी आ. सुलभा खोडके, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य डॉ. विद्या शर्मा, डॉ. मनीषा कोडापे, विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १० किलो चांदीचा गोलमाल : पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

सराफा दुकानात काम करणाऱ्या एका व्यक्तीने मालकाचा विश्वासघात करून दहा किलो ७८० ग्रॅम चांदीचा गोलमाल केल्याची घटना उजेडात आली. या घटनेची तक्रार खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पोलिसांनी संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सराफा बाजारात राहणाऱ्या अमित गिरधारीलाल सोनी यांचे सराफ्यातच चांदीचे दुकान आहे. याठिकाणी राजस्थानत्वा मूळ रहिवासी धर्मवीर सूरजराम जाट हा काम करीत होता. परंतु २६ मार्च २०२३ ते २ एप्रिल २०२३ दरम्यान या दुकानातील दहा किलो ७८० ग्रेम चांदीचा त्याने अपहार केल्याचाआरोप पोलिसांत दिलेल्या तक्रारीत करण्यात आला आहे. या चांदीची किंमत आठ लाख ३० हजार ६० रुपये आहे. तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरू केला आहे.




दरम्यान, फसवणुकीची आणखी एक घटना शहरात उजेडात आली. शंकरनगर जवळील हरिओम कॉलनी येथील प्रकाश काशीराव पुसदकर यांनी एका प्लॉटचा सौदा केला होता. त्यासाठी त्यांनी संबंधित व्यक्तीला तीन लाख रुपये रोख व पाच लाखांचा धनादेश दिला. त्यावरून इसारचिष्ठ्ठी करण्यात आली. परंतु संबंधित व्यक्तीने तो प्लॉट दुसऱ्याच्या नावाने केला, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यावरून पोलिसांनीसंशयिताविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू आहे.

**९६ लाखांनी फसवणूक**

एका महिलेचा विश्वास संपादित करून तिची तब्बल ९६ लाख रुपयांनी फसवणूक करण्यात आल्याची घटना गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्याने तिच्या खात्यातून सात लाख ८८ हजार ३०५ रुपये काढले तसेच आयसीआयसीआय बँकेच्या खात्यातून ७७ लाख ४७ हजार ६८६ रुपये व कर्ज खात्यात १० लाख ७२ हजार ९९८ रुपये, असा एकूण ९६ लाख ९ हजार १७० रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे.

# येवद्यात चालतोय खुलेआम वरली मटका

## येवदा पोलिसांच्या नाकावर टिच्चून अवैध धंदे फोफावले अवैध धंद्यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ दर्यापूर (येवदा )**

दर्यापूर तालुक्यातील येवदा येथे अवैध धंद्यांना सध्या ऊत आलाय.येवदा पोलीस स्टेशनच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून वरली, मटका, जुगार यासह विविध अवैध धंदे येवदा पोलीस पोलीसांच्या नाकावर टिचून खुलेआमपणे चालत असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलाय.. एका दुकानात चक्क वरली चा हा धंदा चालत असल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झालाय..त्यामुळे या ठिकाणी अनुचित प्रकार घडून सामाजिक शांततेला गालबोट लागण्याची शक्यता आहे.या ठिकाणी मटका लावणाऱ्यांच्या रांगा लागत असून, सध्या या ठिकाणी वरली मटका खुलेआम सुरू आहे. या वरली मटका चालवणाऱ्यांना एक प्रकारे पोलिस प्रशासनाकडून मूक संमती मिळत आहे, की काय अशी शंका नागरिकांकडून उपस्थित केली जात आहे. त्यामुळे शहरातील सुरू असलेला मटका कायमचा बंद करण्याची मागणी होत आहे.

या संपूर्ण प्रकारावरून भाजपने आक्रमक होत उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करत अवैध व्यवसायिकांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली आहे. भाजपच्या तक्रारीवर पोलीस काय कारवाई करतात याकडे आता लक्ष लागलेल आहे.

## परदेशवारीचा ट्रेंड वाढला; दररोज टपाल कार्यालयात ६० पासपोर्टची पडताळणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

येथील जिल्हा टपाल कार्यालयात दरदिवशी ६० पासपोर्टची (पारपत्र) अमरावतीकरांची परदेशवारी सध्या उच्च शिक्षण, व्यावसायिक मुलींची परदेशात नोकरी आदी कार्यालयातील पासपोर्ट पडताळणी परदेशात नोकरी, व्यवसायानिमित्त स्थायिक झाला की कुटुंबातील अन्य सदस्यांच्या भेटी गाठींमध्ये वाढ होते. त्यासाठी प्रत्येकाला पासपोर्ट तयार करावाच लागतो.जिल्हा टपाल कार्यालयात या कामासाठी एक स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. आकाश ढोरे हे अधिकारी या विभागाचे कामकाजपाहतात. त्यांच्या कार्यालयात दररोज ५० ते ६० नागरिक पासपोर्टासाठीची कागदपत्रे पडताळणी करण्यासाठी येतात. या पडताळणीनंतर नागपुर येथील कार्यालयातर्फे त्यांचा पासपोर्ट तयार करण्याची प्रक्रिया सुरू होते. काही दिवसांनी तो डाकेने संबंधितांपर्यंत पोहोचवला जातो.

# भरधाव वेगातील वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार, महिनाभरातील चौथा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

भरधाव वेगातील वाहनांमुळे महामार्गावरून अधिवासात जाणाऱ्या बिबट्यांचे जीव धोक्यात आले आहेत. अमरावती-नागपूर महामार्गावर वाहनाच्या धडकेत आज पहाटे बिबट्या ठार झाला. वाहनाच्या धडकेत बिबट्याचा हा महिनाभरातील चौथा मृत्यू आहे.

अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार झाल्याची माहिती मिळताच वनविभागाचं पथक अमरावती- नागपूर महामार्गावर पोहोचलं. वाहनाची जोरदार धडक लागल्यानं गंभीर जखमी होऊन बिबट्याचा मृत्यू झाल्याचं वनविभागाच्या पथकाला निरीक्षणा दरम्यान दिसून आलं. मृत बिबट्याला वडाळी वनपरिक्षेत्र कार्यालय परिसरात नेण्यात आलं. याच परिसरात वनविभागाचे



अधिकारी आणि वन्यजीव समितीच्या सदस्यांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात येणार आहेत. त्यानंतर वनविभागाच्या नियमानुसार अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

महिन्याभरात चार बिबट्या ठार- अमरावती शहरालगत असणाऱ्या चिरोडीच्या जंगलात ७ डिसेंबर रोजी सकाळी अज्ञात वाहनाच्या धडकेत एक बिबट्या ठार झाला होता. या घटनेच्या लगेच दुसऱ्या दिवशी याच भागात आणखी एक बिबट्या अज्ञात वाहनाच्या धडकेत दगावला. सलग दोन दिवस दोन बिबट्या एकाच मार्गावर ठार झाल्यामुळं खळबळ उडाली होती. यानंतर २० डिसेंबरला अमरावती-नागपूर एक्सप्रेस हायवेवर वडाळी ते महादेव खोरी दरम्यान गुणवंत बाबा मंदिरालगत दोन वर्षे वयाचा बिबट्या वाहनाच्या धडकेत ठार झाल्याचं समोर आलं होतं. महिनाभरात अमरावती शहर आणि शहरालगत चार बिबट्या ठार झाल्यानं वन्यप्राणीप्रेमींमधून चिंता व्यक्त होत आहे. गेल्या दोन-तीन वर्षांपासून अमरावती शहर परिसरात बिबट्यांचा वावर वाढला. बिबट्यांच्या सुरक्षेबाबत आणि रहिवासी भागात नियमित दिसणाऱ्या बिबट्यांसंदर्भात वनविभागाकडून योग्य नियोजन व्हावं, अशी मागणी आता जोर धरत आहे.

**या परिसरात अनेकदा असतो बिबट्यांचा वावर**

बिबट्या ठार झालेल्या अमरावती- नागपूर महामार्गावरील परिसरात रहिवाशांना अनेकदा बिबट्याचं दर्शन घडतंय. यापूर्वी राहटगाव ,अर्जुन नगर , विभागीय आयुक्तालय परिसर या भागातील रहिवाशांना अनेकदा बिबट्याचा वावर दिसून आला. या भागात आणखी बिबट्या आहेत, असं या परिसरातील नागरिक सांगतात.

दोन्ही बाजूनं डोंगर आणि जंगल असल्यानं संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ परिसरात अनेकदा बिबट्याचं दर्शन घडतं. डिसेंबर २०२४ मध्ये वन विभागाच्या बचाव पथकानं शर्थीचे प्रयत्न करून बिबट्याच्या पिल्लूयाला पिंजऱ्यात कैद केलं.

# कुंभमेळ्यासाठी जिल्ह्यातून दररोज ५०० भाविक रवाना

## शहरातील काही ठिकाणांहून भाविकांच्या जाण्याची व्यवस्था, निवासासोबतच जेवणाचीही सोय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्यात पवित्र स्नान करण्यासाठी जिल्ह्यातून दररोज ५०० भाविक जात असून, तेथे त्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून मार्गदर्शनासाठी शहरातील दसरा मैदान येथील श्री हनुमान मंदिरासह विविध ठिकाणाहून व्यवस्था करण्यात आली आहे. प्रयागराज येथे गेल्यानंतर नेमके कुठे राहायचे, नाश्ता कुठे करायचा, कोणत्या मार्गाचा जाणे-येणे करण्यासाठी वापर करायचा. तेथे कोणत्या वाहनांची सोय आहे. कमी खर्चात कशाप्रकारे शाही स्नानाचा आनंद घेता येईल, कुठे



जाऊन थांबायचे, अशी माहिती दिली जात आहे.

काही भाविक स्वत:च्या वाहनाने तर बहुतांश भाविक हे रेल्वेने प्रयागराजला जात आहेत. थेट अमरावती किंवा बडनेराहून रेल्वे गाड्या नसल्याने ज्या ठिकाणाहून कुंभ मेळ्यासाठी रेल्वेची सुविधा आहे, त्या स्टेशनवरून तिकीटे काढून भाविक रेल्वेने महाकुंभस्थळी पोहोचत आहेत. उर्वरित. पान ४

भाविकांसाठी विविध संस्थांनी महाकुंभ परिसरात अन्नछत्रांची दर १०० ते २०० मीटर अंतरावर सोय केली आहे. त्यामुळे जिल्ह्यातून येथे येणाऱ्या भाविकांनी सकाळी मोफत मिळणारा चहा, बिस्कीट, सकाळी व सायंकाळी मिळणारा पोहे, उपमा, बटाट्याची भाजी पुरी याचा लाभ घ्यावा. त्यानंतर दुपारचे व रात्रीचेही जेवण येथे

### अन्नछत्रांचा लाभ घेण्याचे आवाहन

**खानपानाची कोणतीही अडचण नाही; गरजेनुसार मार्गदर्शन**

सनातन संस्थेद्वारे प्रयागराज येथील महाकुंभात सेवा देण्यासाठी आलो आहे. इतरही अनेक भाविक जिल्ह्यातून आले असून, विस्तीर्ण पसरलेल्या परिसरात त्यांचे वास्तव्य आहे. येथे चहा, नाश्ता, खानपानाची कोणतीही अडचण नाही. दुपारी व रात्री येथे प्रत्येक १०० मीटर अंतरावर एक अन्नछत्र असून, तेथे पोटभर जेवण मिळत आहे. कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून आम्ही भाविकांना आवश्यकतेनुसार मदत व मार्गदर्शन करत आहोत.

**-विलास सावरकर, स्वयंसेवक, अमरावती.**

नि:शुल्क मिळते. तूप लावलेली तंदुरी रोटी, वरण, भात, दोन भाज्या व एक गोड पदार्थ तसेच रात्री पुरीसह दोन भाज्या, वरण व भात, एक गोड पदार्थ असे जेवण मिळत आहे. खानपानातच जास्त पैसा खर्च होतो. तो टाळण्यासाठी अन्नछत्रांचा लाभ घ्यावा, बाहेरचे खाऊन खर्च टाळावा, असे आवाहन अमरावती येथील स्वयंसेवकांनी केले आहे.

# रोहिंगे प्रकरणात चौकशी सुरू होताच दलाल भूमिगत

## चौकशीच्या भीतीपोटी मोबाईल बंद काहीजण शहर सोडून गेल्याची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अंजनगाव सुर्जी**

विविध प्रकारची कागदपत्रे काढून देण्याच्या नावाखाली येथील तहसील कार्यालय परिसरात दलालांकडून सर्वसामान्य नागरिकांची लूट केली जात होती. तालुक्यांत रोहिंग्यांना जन्माचे दाखले दिल्याच्या आरोपानंतर तहसील कार्यालयातील दलाल भीतीपोटी गायब झाले असल्याची चर्चा आहे.

बांगलादेशी नागरिकांना जन्मतारखेचे प्रमाणपत्र दिल्याच्या प्रकरणाची चौकशी सुरू होताच विविध कामांकरिता सक्रिय असलेले दलाल गेल्या काही दिवसांपासून तहसील कार्यालयाकडे फिरकलेसुद्धा नाहीत.अंजनगावसुर्जीच्या तहसील कार्यालयाने बांगलादेशी व रोहिंग्यांना जन्माचे दाखले दिल्याचा आरोप भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. या तक्रारीनंतर शासनाने एसआईटी नेमून चौकशी करण्याचे आदेश दिले, तर जिल्हा प्रशासनाने याप्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी समिती गठित केली. त्यामुळे तहसील कार्यालयात दररोज वेगवेगळ्या विभागांचे अधिकारी व पोलिस चौकशी करण्यासाठी येत असल्याने कार्यालयाच्या परिसरातील दलाल चार ते पाच दिवसांपासून बेपत्ता आहेत. पोलिस आपल्याला चौकशीसाठी ताब्यात घेतील, या भीतीपोटी ते भूमिगत झाले असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. तहसील कार्यालयात ग्रामीणभागातील व शहरातील कामानिमित्त येत असलेले नागरिक दलालांचा शोध घेत असतात, परंतु आता या दलालांचे मोबाईल बंद असल्याची माहिती आहे. दलाल कार्यालयाच्या परिसरात दिसत नसल्यामुळे कागदपत्रे काढणाऱ्या नागरिकांची गर्दी कार्यालयात वाढली आहे. आता दलाल नसल्यामुळे नागरिकांना कागदपत्रे स्वतः काढावी लागत असल्यामुळे शहरातील महत्त्वाच्या कार्यालयात नागरिकांची गर्दी होताना दिसत आहे.

### दलाल पोलिसांच्या रडारवर

तहसील कार्यालयात मिरवणाऱ्या दलालांची चौकशी होण्याची शक्यता आहे. तालुक्यातील दलाल हे अनेक प्रकारचे दाखले बनावट प्रकारचे तयार करून देत असल्याची चर्चा होत आहे. त्यामुळे या चौकशीमुळे बनावट प्रकारची कागदपत्रे तयार करणारी दलालांची टोळी गजाआड होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# आजीवन अध्ययन व विस्तार अभ्यासक्रमाचे तीन विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत एम. ए. आजीवन अध्ययन व विस्तार अभ्यासक्रमाचे कु. प्रतिज्ञा कृष्णराव शेजे (प्रथम) कु. कृपाली भास्कर जुमनाके (द्वितीय) व ओमकार श्रीराम बोडखे (तृतीय) या विद्यार्थ्यांनी






विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळविले आहे.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेला एम. ए. आजीवन अध्ययन व विस्तार हा अभ्यासक्रम कौशल्यपूर्ण व रोजगाराभिमुख असल्यामुळे या अभ्यासक्रमाकडे प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांचा विशेष कल असतो. विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनात अभ्यासक्रमाचे विषय समन्वयक प्रा.डॉ. प्रशांत भगत, प्रा. वैभव जिसकार, प्रा.अंबादास घुले, प्रा.अर्चना ढोरे, प्रा.डॉ. रोहीत येवतीकर, प्रा.अमोल घुलक्षे, प्रा.राहुल मिश्रा, प्रा.स्वाती धनस्कर यांचे विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विभागातील प्राध्यापकवृंद यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# खाजगी रुग्णालयांची महाराष्ट्र नर्सिंग होम अंतर्गत डॉ विशाल काळे यांनी धडक मोहीम मध्ये केली तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

महाराष्ट्र मध्ये महाराष्ट्र नर्सिंग होम अधिनियम अंतर्गत नोंदणी कृत सर्व खाजगी सुतीका गृह,सुश्रुषा गृह यांची धडक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे त्या अनुषंगाने अमरावती शहरात एकूण १३ शहरी आरोग्य केंद्राच्या अंतर्गत असलेले सर्व खाजगी रुग्णालय यांची धडक तपासणी मोहीम स्वतः डॉ विशाल काळे आरोग्य अधिकारी यांनी रुग्णालयात जाऊन नर्सिंग होम कायद्यानुसार नियमाचे पालन करून रुग्णालय यांनी व्यवसाय करावा ह्या साठी संजीवनी शहर आरोग्य केंद्र अंतर्गत येनाऱ्या रुग्णालय येथे अचानक भेट दिली त्याच सोबत डॉ.रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी , डॉ.वैशाली कावरे स्त्री वैद्यकीय अधिकारी संजीवनी शहरी आरोग्य केंद्र यांनी तपासणी केली सर्व खाजगी रुग्णालय यांनी

रुग्णालयाच्या दर्शनी भागात रुग्णाचे अधिकार व रुग्णालयाची जबाबदारी चे नागरिकांची सनद लावणे बंधनकारक आहे तसेच रुग्णालयात देण्यात येणाऱ्या सुविधांचे दर पत्रंक स्थानिक भाषेत व इंग्रजी मध्ये लावणे कायद्याने बंधनकारक आहे तसेच रुग्णालयात फायर नाहरकत प्रमाणपत्र , प्रशिक्षित परिचारिका ,प्रशिक्षित निवासी डॉक्टर , कर्मचारी असणे आवश्यक आहे,बायोमेडिकल वेस्ट ची परवानगी त्याच प्रमाणे रुग्णालयात शौचालय , स्नान गृह , दोन बेड मध्ये असलेले अंतर ,डॉक्टर यांनी हेल्थ प्रोफेशनल नोंदणी व हेल्थ फॅसिलिटी नोंदणी आयुष्मान भारत ह्या पोर्टल वर करणे सुद्धा बंधन कारक आहे याची कसून तपासणी डॉ .विशाल काळे आरोग्य अधिकारी यांनी केली जर नर्सिंग होम क्ट नुसार सर्व बाबीची पूर्तता नसल्यास सादर रुग्णालयावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व शासनास त्याचा अहवाल पाठविण्यात येणार आहे ह्या तपासणी धडक मोहीम मध्ये डॉ.विशाल काळे आरोग्य अधिकारी , डॉ.रुपेश खडसे, डॉ वैशाली कावरे, कु राणी खाणवे उपस्थित होते.